
# श्रीसाईलीला



शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक


किं. ५० नये पैसे

१९५९

स्थापना १९१६

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, मुंबई नं. २





# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३६ वें : अंक २ रा

मे १९५९

संपादक—

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

५१।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

## श्री साईवाक्सुधा



★

ईश्वर जगाचा सूत्रधारी ।
तयाच्या आज्ञेंत वर्तती सारीं ।
हो कां विखार विंचू तरी ।
आज्ञे बाहेरी वर्तेना ॥ २३२ ॥
म्हणवूनि प्राणिमात्रांवरी
प्रेम आणि दयाच करीं ।
सोडीं साहस धरीं सबुरी ।
रक्षिता श्रीहरि सकलांतें ॥ २३३ ॥

—श्री साईसच्चरित अ. १७.



# प्रातःस्मरणीय बोधवचनें

( १ ) सत्समागम आणि भगवंताचें नाम ! हींच करतात परमार्थाचें काम ॥

( २ ) काळजी तळमळ आणि दुःख बद्धपणाचें लक्षण आहे. कोणत्याहि परिस्थितींत आनंदांत असणें हें मुक्तपणाचें लक्षण आहे.

( ३ ) आपले मन नेहमीं गुंतवून ठेवावें. उठणें, बसणें, जप करणें, वाचन करणें, गप्पागोष्टी करणें, चेष्टाविनोद करणें वगैरे सर्व क्रियांमध्यें भगवंताशीं संबंध व संदर्भ असावा, हेंच अनुसंधान होय. मनाला रिकामें ठेवलें कीं, तें विषयांच्या मार्गे धावलेंच समजा.

( ४ ) भगवंत हा अत्यंत दयाळु आहे, लोखंडानें परिसाला मारलें तरी त्याचें सोनेंच बनतें. त्याप्रमाणें भगवंतानें भरताला भाऊ म्हणून तारला; बिभीषण शरण आला म्हणून त्याला तारला; आणि रावणाला शत्रु म्हणूनहि तारला पण त्यानें कोणालाच सोडलें नाहीं.

( ५ ) परमात्मा साक्षात् कल्पवृक्ष आहे. आपण नेहमीं चिंता वाहातों म्हणून तो आपल्याला चिंताच देतो. आपण जर त्याच्याकडे आनंद मागितला तर तो आपल्याला आनंदच देईल.

( ६ ) समाधान ही परमेश्वराची खरी देणगी आहे. ती मिळविण्याचा उपाय म्हणजे भगवंताचें स्मरण होय.

( ७ ) आगगाडीमध्यें ड्रायव्हरवर विश्वास ठेवून आपण स्वस्थ झोंप घेतों. त्याचप्रमाणें भगवंतावर श्रद्धा ठेवून काळजी न करतां आपण स्वस्थ राहावें. ड्रायव्हरपेक्षां भगवंत नक्कीच श्रेष्ठ आहे.

( ८ ) हवें व नको यांचा आग्रह नसावा. यांतच वासनेचें मरण आहे.

( ९ ) आई आपल्याजवळ आहे या भावनेनें मूल जसें निर्भय असतें तसें भगवंत आपल्यापाशीं आहे या भावनेनें आपण निर्धास्त व्हावें.

—श्री गोंदवलेकर महाराज

# प्रिय वाचक—

श्रीसाईलीला मासिकाच्या चालू वर्षाच्या पहिल्या अंकाचें वाचकांनीं चांगलें स्वागत केलें; अनेकांनीं आमचें अभिनंदन केलें. त्या सर्व वाचक भक्तांचे आम्ही आभार मानतों. मासिक आबालवृद्धांना आवडेल असें सर्वांग-सुंदर करण्याचा आमचा संकल्प आहे. पुरेसे वर्गणीदार मिळाल्यास मासिकांत अधिकाधिक सुधारणा करणे आम्हांला सुलभ होणार आहे. श्रीसाईबाबांची व भक्तांची सेवा, या एकमेव उद्दिष्टानें हें मासिक आम्ही चालवीत आहोंत. त्यांत नफ्याची दृष्टि नाहीं. अधिक खर्च झाला तरी निवडक व वाचनीय मजकूर, चांगला कागद व सुबक छपाई असलेला उत्कृष्ट व संग्राह्य अंक दरवेळीं वाचकांच्या हातीं द्यावयाचा हें धोरण आम्हीं ठेवलेलें आहे. या कामीं वर्गणीदारांचें सहकार्य आम्हांला मिळेल असा आम्हीं विश्वास बाळगतो. प्रत्येक साईभक्तानें स्वतः वर्गणीदार होऊन आपल्या इष्ट-मित्रांपैकीं आणखी निदान दोन तरी वर्गणीदार मिळवून दिले तर तें मोठें साहाय्य ठरणार आहे.

× × ×

पत्रांच्या सांखळीच्या दुष्ट प्रथेविषयीं मागें एकदां आम्ही आमचें स्पष्ट मत व्यक्त केलें होतें. अधूनमधून ही प्रथा जोरावते असें आढळून येतें. साई-बाबांच्या नांवाचा उपयोग करून एखादें पत्र एखाद्या माणसाच्या पत्त्यावर पाठविलें जातें. कांहींतरी वेडगळ व धमकी-वजा मजकूर त्या पत्रांत असतो. पत्र मिळालेल्या माणसानें अशीच नऊ पत्रें इतरांना पाठविलीं तर त्याच्यावर साई-कृपा होईल व पाठविलीं नाहींत तर त्याच्यावर भयंकर अनर्थ कोसळेल अशा आशयाचा मजकूर त्या पत्रांत असतो.

भोळीं माणसें असल्या पत्रांनीं घाबरून जातात. 'उगाच साईबाबांचा कोप व्हायला नको' या भीतियुक्त भावनेनें तीं अशीं पत्रें पाठवून मोकळी होतात आणि आपल्या भीतीची लाट अधिक पसरवून ठेवतात. असलें पत्र आलें म्हणजे तें केराच्या टोपलींत अगर पाण्याच्या बंबाच्या आगींत टाकणें हेंच त्या पत्राला खरें उत्तर. देव कधीं धमक्या देत नाहीं. तो केवळ प्रेमाचा भुकेला असतो. देवाच्या नांवावर असले पत्रांचे प्रकार चालविणारीं माणसें हीं देव–भक्त नसून देवाचे शत्रू आणि समाजकंटक असतात. भक्तांनीं त्यांच्या बाष्कळ मूर्खपणाला घाबरून जाऊं नये आणि असल्या दुष्ट पत्रांची दखलहि घेऊं नये.

—संपादक




संकलक : आमचे प्रतिनिधि

**श्री. प्रभाकर धुवे, ऑल इंडिया रेडिओ, भोपाळ हे लिहितात :–**
माझी थोरली बहीण पंचावन्न सालांत बाळंतपणासाठीं अमरावतीला माहेरी आली. तेथें ती आजारी पडली. वडिलांनीं तिला इस्पितळांत दाखल केली. एक महिनाभर औषधोपचार चालू होते. परंतु तिच्या प्रकृतींत सुधारणा होईना. जसजसा प्रसूतिकाळ जवळ आला तसतशी तिच्या तब्येतीची काळजी वाटूं लागली. प्रसूतीचा समय नजीक येतांच तिला असह्य वेदना होऊं लागल्या. लेडी डॉक्टर म्हणाली,

'मूल शस्त्रक्रियेनें बाहेर काढावें लागेल. पण शस्त्रक्रिया कितपत यशस्वी होईल याबद्दल शंकाच आहे.'

वडिलांनीं लेडी डॉक्टरचें म्हणणें ऐकलें. ते घरीं परत आले व कुणाला न सांगतां श्रीसाईबाबांच्या तसबिरीसमोर ऊदधूप जाळून उभे राहून तळमळीनें प्रार्थना करूं लागले. त्यांनीं साईबाबांची अनन्यभावानें करुणा भाकली आणि बाबांनीं ती ऐकली. त्याच रात्रीं माझी बहीण कांहीं त्रास न होतां सुलभपणें प्रसूत झाली आणि तिला मुलगा झाला. बाळ–बाळंतीण सुखरूप असल्याचें सकाळीं सर्वांना समजलें. या 'केस' बद्दल बऱ्याच भयशंकित असलेल्या लेडी डॉक्टरनांहि माझ्या बहिणीच्या सुलभ–प्रसूतीनें सानंद आश्चर्य वाटलें.

भक्तांनीं अंतःकरणाच्या तळमळीनें हांक मारली कीं साईबाबा त्यांच्या हांकेला ओ देऊन त्यांच्या संकट निवारणार्थ धांवून जातात, हा आमचा विश्वास या घटनेनें अधिकच दृढ झाला.

## उदीनें खोकला गेला

श्री. मधुकर गजानन पाटणकर ( ललित इस्टेट नं. १०, ६६, घोडबंदर रोड, अंधेरी, मुंबई उपनगर ) हे शिर्डीस तारीख १०–६–५२ रोजीं आलें असतां त्यांनीं खालील अनुभव सांगितला—

'सुमारें १॥ वर्षांपूर्वी मला खोकल्याचा फार त्रास होता. सबंध रात्र खोकत असे. दम लागे. डॉक्टरचें औषध चालू होते. महिनाभर घेतलें. पण गुण नाहीं. फार त्रास होऊं लागला. डॉक्टरांनीं सांगितलें कीं, हवापालट करा. मी एकदम चिडून गेलों व औषध बंद केलें. मी साईबाबांचा भक्त आहेच. माझे आईवडिलहि साईभक्तच आहेत. आमचे घरांत बाबांची पूजा वगैरे होतच असते. परंतु बाबांची उदी या खोकल्याच्या आजारपणांत औषध म्हणून हा वेळ पावेतों घेतली नव्हती. आतां

डॉक्टरच्या औषधाची व त्यांच्या उपचाराची एक प्रकारची चीड आल्यामुळें ते औषध मी बंद केले व बाबांचे उदीचें औषध घेऊन पाहूं असें वाटून, बाबांवर श्रद्धा ठेवून, रोज रात्रीं निजतांना मी पाण्यांत उदी कालवून घेऊं लागलों. १०।१५ दिवसांतच १६ आणे गुण आला. त्यानंतर जो खोकला गेला तो अजिबात नाहींसा झाला.

## बाबा नवसाला पावले

सौ. लक्ष्मीबाई नारायणराव तावरे ( १४८४, शुक्रवार पेठ, ठाकूरदास यांचा वाडा, पुणें नं. २ ) यांचा अनुभव :—

'माझ्या लग्नास १४ वर्षें झाली. लग्न झाल्यानंतर १ वर्षानें मुलगा झाला; परंतु तो ११ महिन्यांचाच होऊन वारला. त्यानंतर जवळ जवळ १२ वर्षांत मला मूलबाळ कांहींच झाले नाहीं. या १२ वर्षांत नानाप्रकारचे इलाज केले. डॉक्टरी औषधें झालीं, खाजगी बायकांना दाखविले आणि मंत्र, तंत्र व देवदेवसकिही पुष्कळ झाली. या सर्वोपायीं आमच्या शक्तीबाहेर आमचा खर्च झाला, पण परिणाम कांहीं नाहीं. शेवटीं निराश व हताश झालों. अत्यंत वाईट वाटत असे. पण काय करावे ते समजेना.

'अशा स्थितींत येवल्याचे भागुजीराव धसे (साळी) यांचेकडे आम्हीं सहज भेटण्यास आलों असतां आम्हांस बाबांची माहिती कळली. नंतर श्री. धसे यांनीं स्वतः आम्हांस शिर्डीस मार्च १९५२मध्यें बाबांचे दर्शनास आणलें. मी बाबांस नवस केला कीं, 'आपल्या कृपेनें वर्षाच्या आंत जर मला मूल झाले तर त्याला ते वर्षाचे होण्याचे अगोदरच आपले दर्शनास आणीन.'

'येथून घरीं गेल्यावर ४।५ दिवसांतच मला एक स्वप्न पडले. स्वप्नांत बाबा भगव्या वस्त्रांत दिसले आणि त्यांनीं माझे डोक्यावर हात ठेवून सांगितले कीं, 'जें तुझ्या मनांत आहे तें काम होईल, चिंता करूं नकोस.' हा दृष्टांत झाल्यावर त्याच महिन्यांत मी गरोदर राहिले. २।३ महिने गेल्यावर मला एक प्रकारची भीति वाटूं लागली. नेहमीं असें वाटूं लागले कीं, कोणीतरी आपणांस करणी करील अथवा कोणाची तरी आपणांस दृष्ट होईल. अशा सदैव भीतिग्रस्त मनःस्थितींत असतां ६ व्या महिन्यांत मला एक भयंकर स्वप्न पडलें. स्वप्नांत दोन माणसें दोन बाजूंनीं आली आणि ती माझा गळा दाबूं लागली. इतक्यांत डोक्यास पांढरे फडके, अंगांत कफनी आणि हातांत माळ अशा स्वरूपांत बाबा आले आणि मला म्हणाले, 'बेटी मत डरो. कुछ होयगा नाहीं. रामराम बोलो सब ठीक होयगा.' ती दोन माणसें तेथल्या तेथेंच उभी राहिली पुढें आलींच नाहींत आणि तेवढ्यांत मी जागी झाले.

'मला या स्वप्नाचा मोठा चमत्कार वाटला व बाबा आपले पाठिराखे आहेत याची खात्री वाटून फार आनंद झाला. तेव्हांपासून माझी भीति साफ नाहींशी झाली. पुढें गुरुवार ता. १८-१२-५२ रोजीं ताराचंद हॉस्पिटलमध्यें संध्याकाळीं ६ चे सुमारास कांहीहीं त्रास न होता मी सुखरूप बाळंतीण झाले व मला मुलगा झाला. मुलाचा जन्म गुरुवारीच झाला म्हणून आम्हांस फार आनंद वाटला व हें सर्व बाबांच्याच कृपेचें फळ होय यांत बिलकूल शंका नाहीं. बाबा नवसाला पावतात यांत तिळमात्र संदेह नाहीं. मुलाचे नांव 'दत्तात्रय' असें ठेवलें आहे.

———

## अक्कलकोट येथील साईबाबा मठ-निवासी

# श्री बेलेनाथ बाबा

द. पां. खांबेटे

अक्कलकोट येथें साईबाबा मठांत निवास करणारे श्रीबेलेनाथ बाबा हे दिसतांना पंचविशीच्या वयाचे तरुण दिसतात. तुम्हीं अल्पकाळहि त्यांच्या सान्निध्यांत आलांत तरी त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाची छाप तुमच्या अंतःकरणावर पडल्यावांचून राहात नाहीं. विनोद करीत हंसत खेळत ते बोलतात. पण त्यांच्या साध्या शब्दांतहि खोल अभिप्राय असल्याचें तुमच्या ध्यानांत येऊं लागतें. एखादी गोष्ट सांगतां सांगतां तुमच्या मनांतील एखाद्या गुंतागुंतीच्या प्रश्नांची निरगाठ ते सहज रीतीनें उकलून दाखवतात. त्यांनीं सहज रीतीनें काढलेला एखादा उद्गारहि तुमच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालायला समर्थ असतो.

यासंबंधीं माझा स्वतःचाच एक अनुभव सांगतों.

### एका डाळिंबाची गोष्ट

बेलेनाथ बाबा गेल्या डिसेंबरांत मुंबईला आले होते. त्यांच्या दर्शनाला मी निघालों होतों. साधुसंतांकडे जातांना रिक्त हस्तानें जाऊं नये असें मी ऐकलें होतें. काय न्यावें, असा विचार मनांत आला. हार घेऊन जाण्याची कल्पना प्रथम सुचली. पण बेलेनाथ बाबा आपल्या गळ्यांत हार घालून घेत नाहींत म्हणून ती कल्पना बाजूस सारली. पेढे-बरफी वगैरे कांहींतरी न्यावें म्हणून मी रस्त्यावरच्या दुकानांचें निरीक्षण करूं लागलों. मिठाईवाल्याचें एक दुकान आढळलें पण तें दुकान रंगारूपानें इतकें 'चांगलें' असल्याचें मला वाटलें नाहीं. मिठाई असणार हलक्या प्रतीची नि किंमत मात्र असणार चांगल्या मालाची! उगाच कशाला?' म्हणून मिठाई घेण्याचा विचारहि रद्द केला. तेवढ्यांत फूटपाथवर मस्कती डाळिंबे दिसलीं. हां! एखादें डाळिंब न्यावें, असें ठरवून मी त्या बाजूला वळलों. यांतहि एक सूक्ष्म अहंकार होता! केळीं, संत्रीं, मोसंबीं हीं सहजासहजीं मिळणारीं फळें अनेकजण आणतात. मोठीं, लालभडक रसरशीत दिसणारीं डाळिंबें हीं नेहमींच मिळतात असें नाहीं. तेव्हां आपण जर डाळिंब नेलें तर आपली भेट इतरांच्या भेटींमध्यें 'उठून दिसेल' हा तो अहंकाराचा विचार होता.

डाळिंबाच्या दोन राशी होत्या. एका राशींतलीं डाळिंबें प्रत्येकीं एक रुपया किंमतीचीं होती नि दुसरी रास चवदा आणे भावाच्या डाळिंबाची होती.

मी फळांचा तज्ज्ञ नव्हे. माझ्या अतज्ज्ञ दृष्टीला दोन्ही राशींतलीं डाळिंबें वरून सारखींच दिसत होती. तेव्हां अकारण दोन आणे जास्त कां द्या? हा 'शहाणा' विचार मनांत डोकावला. मी चौदा आणेवाले एक डाळिंब निवडून घेतलें आणि प्रसन्न होत्साता मी बेलेनाथ बाबांकडे जायला निघालों.

तें डाळिंब हातांत फिरवीत चाललों असतांना, त्या डाळिंबाची एक पैशा-एवढी बाजू जरा जास्त नरम आहे हें मला जाणवलें. 'बापरे! म्हणून याची किंमत दोन आण्यांनीं कमी होती कीं काय?' असें मनांत आलें. पण लगेच मन म्हणालें 'कशाला शंका घेतोस? दिसायला छान आहे कीं डाळिंब!'

बेलेनाथ बाबांपुढें जाऊन मी तें डाळिंब त्यांच्या हातांत दिलें आणि त्यांच्या पायावर भक्तिभावानें डोकें ठेवलें. परत मी वर मान करतांच माझ्याकडे सहास्य मुद्रेनें पाहून बाबा म्हणाले,

'मी मागितलं होतं काय?'

मी चमकलों, अर्धवट पुटपुटत म्हणालों,

'नाहीं, बाबा! पण मला आणावंसं वाटलं म्हणून आणलं!' यावर ते अधिक कांहीं बोलले नाहींत.

पण त्यांच्या त्या प्रश्नानें माझ्या डोळ्यांत अंजन घातलें हें खरें आहे. संसारांतल्या वस्तु खरेदी करतांना, आपल्या प्रेमाच्या आप्तनातलगांना भेटी देऊन देतांना, माणूस हिशोबीपणा ठेवीत नाहीं. त्या प्रेमापुढें माणसाला पैसा कःपदार्थ वाटतो. पण देवाकडे अथवा साधुसंतांकडे जातांना मात्र माणसाच्या मनांतला सारा हिशोबीपणा उचंबळून येतो. देवळांतल्या बंद पेटींत आपल्या जवळचीं गुळगुळीत नाणीं टाकण्याचा मोह कोणाला आवरला आहे? प्रीती म्हणून नव्हे तर भीति म्हणूनच आपण देवधर्म करीत असतो. उगाच या देवाचा कोप व्हायला नको नि आपल्याला कटकट नको, म्हणूनच देवाला कांहींतरी देऊन मोकळे होण्याची आपली खटपट चालू असते. देवाला तुमचें कांहीं नको, त्याला फक्त तुमच्या प्रेमाची भूक आहे, हें वचन जन्मभर आपल्या कानांवर पडत असतें. पण त्या वचनाचा आपल्या अंतरगांत क्वचितच प्रवेश होतो.

## एका साधकाची गोष्ट

या संदर्भात बेलेनाथबाबांनीं एकदां सांगितलेली एक गोष्ट आठवते. एका साधकाला एक सत्पुरुष एकदां म्हणाला,

'तुला सामर्थ्य हवं आहे काय! मी तुला सामर्थ्य देतों. पण त्यासाठीं तुलाहि एक गोष्ट द्यावी लागेल.'

तो साधक आपल्याला सामर्थ्य प्राप्ती होणार या आशेनें आनंदून उद्गारला.

'देईन कीं! काय देऊं मी?'

तो सत्पुरुष म्हणाला,

'मी तुला एक छटाकभर सामर्थ्य देतों. त्यासाठीं तूं मला गुंजभर प्रेम दे!'

हें ऐकतांच साधकाचा चेहरा पडला! तो म्हणाला,

'प्रेऽम ! गुंजभर प्रेम ! पण तें नाहीं हो माझ्याजवळ !'

सत्पुरुष म्हणाला,

'बघ विचार करून ! गुंजभर प्रेम दिलंस तर एक छटाक सामर्थ्य, दोन गुंजा प्रेम दिलंस तर दोन छटाक सामर्थ्य अशा प्रमाणांत तुला सामर्थ्य द्यायची माझी तयारी आहे. पण प्रेम पाहिजे बाबा !'

त्या साधकापाशीं तेवढेंच नेमकें नव्हतें त्यामुळें त्याला निराश होऊन बसावें लागलें.

## देवाची पूजा कशी करावी ?

आपला एक सांसारिक हेतु पूर्ण व्हावा, म्हणून बेलेनाथ बाबांचा आशीर्वाद मागण्यासाठीं एक स्त्री त्यांच्या दर्शनाला आली. बाबांनीं विचारलें,

'तुम्ही कोणाची भक्ति करतां ?'

ती म्हणाली, 'साईबाबांची !'

'त्यांना काय सांगतां ? कशी त्यांची प्रार्थना करतां ?'

ती स्त्री गप्प राहिली.

बाबा म्हणाले,

'तुम्ही मागाल तें द्यायला साईबाबांची तयारी आहे. पण तुम्हीं त्यांच्याकडे मनापासून मागितलें पाहिजे. आतां असं करा. तुमच्याकडे साईबाबांचा फोटो आहे ?'

'आहे.'

'त्या फोटोसमोर बसा. साईबाबांच्या पायांवर पाणी घाला. समोर आहे तो नुसता फोटो नसून, स्वतः साईबाबाच आपल्यासमोर बसले आहेत अशी भावना धरा. आणि आपल्या मनांतलें सगळें काय तें त्यांना सांगा. त्यांना म्हणा कीं, 'बाकी सगळ्या गोष्टी यथास्थित आहेत, पण ही एक नाहीं म्हणून मी दुःखी आहे. बाबा माझ्यावर कृपा करा आणि माझी ही आस पुरवा ?' अंतःकरणाच्या तळमळीनें साईबाबांपाशीं बोला. साईबाबा प्रत्यक्ष समोर बसून तुमची प्रार्थना ऐकताहेत अशी दृढभावना ठेवा आणि मोकळेपणानें त्यांच्याशीं बोला. असें अगदीं अंतःकरणापासून आपलें मन त्यांच्याजवळ बोलून दाखवलंत तर साईबाबा तुमची प्रार्थना खास ऐकतील. ऐकलीच पाहिजे त्यांनीं ऐकतील कीं नाहीं ?'

'होय.'

"मग जा. आतां सांगितली तशी त्यांची पूजा करा यापुढें. देव प्रत्यक्ष आपल्यासमोर बसला आहे नि आपली पूजा घेतो आहे, अशा भावनेनें मन भरून टाकून त्याची पूजा केली पाहिजे.'

## काव्यमय वाणी

बेलेनाथ बाबांच्या मराठी बोलण्यावर कानडी स्वरपद्धतीची झांक आहे. यांना मराठी भाषेचें चांगलें ज्ञान नाहीं, असें यामुळें तुम्हांला वाटेल तर मात्र तो भ्रम ठरेल. कित्येकदां इतकी काव्यमय वाणी ते उच्चारतात कीं ती ऐकून मन आनंदमुग्ध होतें.

एकदां ते म्हणाले,

'बिळांत साप आहे म्हणून एखादा माणूस तो साप काढण्यासाठीं अनेक दिशांनीं बिळ खोदीत खोदीत दूरवर जातो. खूप वेगानें पुष्कळ परिश्रम करून तो बिळ दूरवर खोदून थकतो. साप असतो बिळांत वितीच्या अंतरावर. पण तरीहि तो या माणसाला कांहीं सांपडत नाहीं आणि त्याचे सगळे परिश्रम निष्फळ ठरतात. देवहि असाच वितीच्या अंतरावर असतो...'

'मनाला शांति नाहीं ती मिळेल असें करा' अशी एका गृहस्थानें बेलेनाथ बाबांकडे प्रार्थना केली. त्यावर बोलतांना बाबा म्हणाले,

'एखादा माणूस गुलाबांच्या ताटव्यांतून फिरत असतो. गुलाबाच्या कांटेरी डहाळींत त्याचें वस्त्र अडकतें. वस्त्र सोडवून घेतांना तो माणूस त्रासिकपणें म्हणतो, 'काय बाबा या कांट्यांचा उपद्रव! फुलं कुठंच नाहींत. नुसते कांटे!' ती कांटेरी डहाळी सोडवितांना त्याला नुसते कांटेच दिसतात. पण हातानें ती डहाळी बाजूस करतांना आपल्या बोटांच्या अगदीं जवळ पानांखालीं अर्धवट झांकलेलें सुंदर सुवासिक फूल आहे, हें त्याला दिसतच नाहीं. फुलाकडे त्याची दृष्टीच जात नाहीं, त्याची सगळी नजर राहिलेली असते कांट्यांवर! याला काय करावें!'

दोघां तरुण विवाहित मुलींशीं बोलतां बोलतां एकदां ते म्हणाले,

'बायकोनें नवऱ्याची भक्तीनें सेवा करावी. त्याच्या क्रोधावर उलट क्रोधाचें प्रत्युत्तर करूं नये. नवऱ्याचा क्रोध देखील फुलासारखा आपल्या हातांत झेलावा आणि आपल्या वेणींत खोंचावा!'

विटलेल्या अंतःकरणांनीं आणि सुरकुतलेल्या चेहऱ्यांनीं अत्यंत कष्टकर उपासतापास आणि विधिविधानें याचा आचार करीत राहाणें, ही साधना नव्हे. प्रेम! निरपेक्ष प्रेम! हें साऱ्या साधनेचें रहस्य. आई आपल्या मुलांसाठीं कमालीचे कष्ट सोसते—पण तिला जाणीव असते ती फक्त मुलाबद्दलच्या प्रेमाची, कष्टांची नव्हे. त्या प्रेमाच्या आनंदापुढें सारे कष्ट ती विसरते. संसारी जीवनांत त्यांतल्या त्यांत विशुद्ध प्रेम म्हणजे मातृप्रेम. पण मातृप्रेमाच्याहि अनंत पटींनीं मोठें असलेलें प्रेम म्हणजे संतांच्या अंतःकरणांत वसत असलेलें निरपेक्ष प्रेम. या प्रेमाला कसलीच उपमा देतां येण्यासारखी नाहीं. आपल्या मनाला या अथांग प्रेमाची कल्पनाहि करतां यायची नाहीं. या अशा प्रेमाचा एक कणहि आपल्या अंतःकरणांत उदय पावला तर कसलीहि खडतर साधना सहज लीलेनें आपल्या हातून घडेल. पण जाऊंदे! हें माझें सारें वृथा वाक्पांडित्य! मला सांगायचें होतें तें एवढेंच कीं, संसारांत श्रमलेल्या आणि शिणलेल्या आपल्या मनाला थोडा शीतल विसावा मिळावा अशी आस ज्याला लागून राहिली असेल, त्यानें बेलेनाथ बाबांच्या सहवासांत कांहीं काळ राहावें.

# एकान्तवासाचा अर्थ

अक्कलकोट येथील श्री बेलेनाथ बाबा हे कधीं कीर्तन—प्रवचन करीत नाहींत. सहज बोलतां बोलतां प्रसंगानुरोधानें ते कधींकधीं परमार्थाचीं रहस्यें विशद करून सांगतात. एकदां एकान्तवास आणि ज्ञानप्राप्ति यांचा विषय निघाला असतां, एकान्तवासाचा खरा अर्थ त्यांनीं स्पष्ट करून सांगितला. तो मनोवेधक आणि मननीय वाटल्यावरून येथें दिला आहे....

परमेश्वराचें सातत्यानें चिंतन, इंद्रिय नियमन आणि दमन याबाबतींत एकांतासारखें अन्य साधन नाहीं. पंडित आणि अपंडित या दोघांनाहि सारखीच फलप्राप्ती देणारें तें साधन आहे. गीता, ज्ञानेश्वरी यांचा अभ्यास करून ज्यानें एकांतांतील मनोविजय मिळविला त्यालाहि भगवंतांनीं म्हटलें आहे कीं, 'जीव' ही श्रद्धा बाळगील तर तो तत्क्षणीं मुक्त आहे. पण जीवाची तशी एकदम श्रद्धा होत नाहीं. म्हणूनच परमार्थ मार्गांचा खटाटोप आणि परमार्थाचें ज्ञान, यासाठीं एकांत साधनाचे कष्ट करावे लागतात.

## एकान्तवासाचा हेतु

तथापि, एकांतांत अखंड चिंतन नसेल तर एकांताचे कष्ट व्यर्थ होत. किंबहुना सतत अखंड चिंतन व्हावें हाच एकांताचा हेतु! बाह्य वस्तूंवरून दृष्टि उडून अंतर्मुख व्हावी, हृदयस्थ आत्म्याकडे सर्वच्या सर्व वृत्ती केंद्रीभूत होऊन लीन व्हाव्यात म्हणूनच एवढा एकांताचा प्रपंच! बाह्यावरून दृष्टि अंतराकडे खेंचण्याचें कार्य, एकांतांत न बसतां जगाच्या खुल्या मेळाव्यांत राहून होत असेल तर एकांताचें प्रयोजन काय? एकांताचें महत्त्व जर एवढें मोठें आहे तर एकांतांत परमेश्वर चिंतनांत मग्न असलेल्या व्यक्तीला चिंतनांतून डोकें वर करून पहातां येणार नाहीं.

**एकांत याचा अर्थ बाह्य विचार हाकलून लावून अंतर रिकामें करावयाचें आणि त्या स्थानांत परमेश्वरा व्यतिरिक्त कोणताहि अन्य विचार रिघूं द्यायचा नाहीं आणि ही स्थिति कायम स्थिर होण्याचा प्रयत्न करायचा, असा आहे.**

असें आहे तर एकांतात ईश्वराव्यतिरिक्त कोणत्याहि विचाराला थारा नाहीं.

एकांत स्थिती अशी आहे. त्यामुळें त्या स्थितींत बाह्य भावना किंवा अनुभव प्रकट होऊं शकत नाहीं आणि जगांत वावरणाऱ्या साधुसंतांमध्यें साधु कोण भोंदू कोण हें समजण्याचा काल आणि स्थान एकांत हा नव्हे. असें असतां एकांतांत ईश्वर चिंतनांत मग्न असलेल्या व्यक्ती पर-निंदा करीत असतील इतकेंच नव्हे तर सामान्य व्यक्तीप्रमाणें गप्पागोष्टी किंवा अन्य करीत असतील, तर त्या व्यक्तीचा तो एकांत नसून देखावा, ढोंग असलें पाहिजे. तो ढोंगी नसेल तर पांडित्याच्या आहारी गेल्यामुळें जो बुद्धि भ्रम होतो त्यामुळें एकांताचा अर्थच कळलेला नसून कुठेंतरी कसातरी चांचपडत असलेला एक प्रवाहपतित प्राणी यापलिकडे त्याला अन्य संज्ञा नाहीं.

## ‘व्यर्थ पुस्तकाचें ज्ञान’

परनिंदेच्या बाबतींत तुकाराम महाराजांचा गाथापाहिला तर त्यांतहि ‘धर्म भूताची ते दया। या सर्वांचें तात्पर्य हे कीं, ‘यातायाती धर्मी विष्णुदासा निर्णय’ ऐसा वेदशास्त्री। तुका म्हणे तुम्हीं विचारावें ग्रंथीं॥ काय सांगावें? संत कारण ऐसिया। असें आढळून येतें. तुमच्या आमच्यासारखे ‘तारले पतित नेणों किती.’ तुकाराम महाराज आपल्या अभंगवाणींतून प्रथमपासूनच कंठरवानें ओरडून सांगत आहेत। ‘पुस्तक ज्ञानाच्या आधारें। तो करील निंदा सतांची’ याबाबतींत अनेक ठिकाणीं महाराजांनीं म्हटलें आहे–‘काय केली जलचरीं। धिवर त्यांच्या घातावरील। हा तो ठायींचा विचार। आहे याती वैराकार॥ श्वापदें वधी। निरपराधी पारधी। तुका म्हणे खळ। संतां पिडीती चांडाळ॥

या सर्वांतून हीच सत्य गोष्ट स्पष्ट होत नाहीं का? कीं संताची निंदा घडावी म्हणून खल हा असतो. मग तो उघड्या जगांत फिरणारा व्यवहारीं असो वा एकांतात बसलेला दाढीदिक्षित असो! दोघेहि एकाच जातीचे खल. या खलांचें काम एवढेंच कीं आपलें पुस्तकी ज्ञान भांडार आपल्या तोकड्या बुद्धीनें भाविक पण भाबड्या जनतेपुढें आणि जसा वर्णाश्रम मिळेल तशा प्रकारच्या भाषेचा वापर करून कार्य करणें. पण तुकारामाच्या भाषेंत सांगायचें झाल्यास ‘जोडूनी अक्षरें करीतो तोंडपिटी’ असेंच म्हणावें लागेल. पण बिचाऱ्याच्या ‘न लगे शेवटीं हातीं कांहीं.’

यासाठीं एकांतवासियांना महाराजांचें एक वचन बोध घेण्यासारखें असल्यानें त्याचा त्यांनीं जरूर अभ्यास करावा. ‘अनुभव नसतां जाण। व्यर्थ पुस्तकाचें ज्ञान.’

———

# हिंदु धर्म आणि पार्शी धर्म

भविष्य पुराणांतील शाकद्वीप हें आतां इराण या नांवानें प्रसिद्ध असून तेथें 'मग' या नांवाची जात असल्याचे इतिहासावरून दिसून येते. त्यास मनूनें पल्हव (पार्शी) असें म्हटलें आहे. डॉ. हॉगसारख्या चौकस इतिहाससंशोधकांनीं पार्शी धर्मग्रंथाचें आस्थापूर्वक परिशीलन करून असें सिद्ध केलें आहे कीं, 'हिंदू हे मूळचे इराण देशाच्या उत्तर प्रदेशीं होते. तेथें कांहीं कुलांत भाऊबंदकी उत्पन्न होऊन यादवी माजली व जे थोडे लोक देशत्याग करून पूर्वेस निघाले, त्यांनीं प्रथम पंजाब प्रांतांत ठाणें दिलें. या आर्यांच्या अंतःकरणांत देव व धर्म यांबद्दल सद्भाव वसत होता. यास्तव त्यांजकडून जें अति महत्त्वाचें कार्य घडलें, तें धर्मासंबंधींच होय.' आर्यांच्या आद्य ग्रंथास 'वेद' असें नांव असून इराणांतील त्यांच्याच भ्रातृव्यांनीं पूज्य मानलेल्या ग्रंथास झेंदावेस्ता असें म्हणतात. झेंद ही जुन्या संस्कृताशीं जुळणारी भाषा आहे.या दोन्ही ग्रंथांत वर्णिलेल्या देवता बहुशः एकच आहेत. इतकेंच नव्हेतर ऋग्वेदांतील कैक देवता त्याच नांवानें किंवा अल्प रूपान्तरानें झेंदावेस्ता ग्रंथांत सांपडतात. वायु, वृत्रघ्न, इविष्ठ (यविष्ठ) या देवता व सूर्य आणि वरुण यांची उपासना त्याच किंवा तत्सम नांवानीं केलेली आढळते. यज्ञयागादिकांचे सर्व विधि समान असून, निरनिराळ्या स्तोत्रसमूहांस लाविलेला 'यस्न' हा शब्द यज्ञ व यजनवाचक आहे. आमचे यज्ञ सोमरस आणि पवित्र मांस यां शिवाय होत नसत. त्याचप्रमाणें पारसिकांचे यज्ञहि या द्रव्यांशिवाय सांग होत नसत. सोम या अर्थी हो आम हा शब्द झेंदावेस्ता ग्रंथांत वापरलेला आहे. मित्रवरुणादिकांच्या कथा ऋग्वेदांतल्या प्रमाणेंच हुबेहूब झेंदावेस्ता ग्रंथांत सांपडत असून, कित्येक प्रार्थनांचें भाषांतर केल्यास तें या दोहोंपैकीं कोणत्या ग्रंथांतील आहे, हेंहि अचूक सांगणें कठीण आहे.

ज्या प्रमाणें पारशांच्या धर्मग्रंथांत देव हा शब्द मूलतः देवार्थींच योजला आहे, तसाच ऋग्वेदाच्या कांहीं भागांत असूर हा शब्द देवत्ववाचक वापरला आहे. अग्नि, इंद्र, वरुण वगैरे देवतांची स्तुति ऋग्वेद आणि झेंदावेस्ता ग्रंथांत सारखीच केलेली आढळते. यावरून पारशी व आर्य लोक विभक्त होण्यापूर्वींच्या प्रार्थना त्यांच्यांत होत्या; त्या विभक्त झाल्यावरहि त्यांनीं यथातथ्य ठेवल्या वेद हे अपौरुषेय आहेत असें आर्यांचें मत आहे. झेंदावेस्ता धर्मग्रंथ देखील देवाकडून प्राप्त झाला असें त्यांचें म्हणणें आहे. आर्यांचा आद्य मनू मोठा नीतिशास्त्रज्ञ होऊन गेला. त्याच-

प्रमाणें पारसिकही आपला मनुश्चेचर (मनुष्येश्वर) हा मोठा स्मृतिकार होऊन गेला असें मानतात.

हिंदूनीं ब्रह्म हें सकल वस्तूंचें आदिकारण मानलें आहे. तर त्याचा इराणीबंधूनीं ब्रह्मन म्हणजे चांगलें मन असा अर्थ केला. येथील आर्यांनीं पुनर्जन्मापासून मुक्त होण्याचे उपाय शोधले तर पारसिकांनीं आपलें मृत शरीर पुनः सजीव होईल असें मानून देहात्मवादास साजेशा रीतीनें अमरत्व मागितलें. पारसिकांचे मुख्य धर्मग्रंथ झेंदावेस्ता, गाथा, वेंदिदाद, यजस्ने अथवा यस्न हे आहेत. एकंदरींत आपले धर्मग्रंथ अपौरुषेय असल्याबद्दल या दोन्ही धर्मीयांची कल्पना, पारसिकांची ब्रह्मन तसें आर्यांचें ब्रह्म त्याचप्रमाणें श्रोश यांशीं जमता शब्द श्रुति वगैरेवरून पाहतां पारशी हे आमचे केवळ देशबंधूच नसून धर्मबंधूहि आहेत असें आज प्रत्ययास येत आहे. अद्यापि इराणी लोक आपल्याला दांघावो असें म्हणवितात. दस्यवः व दानव हे शब्द दांघावो यावरून आले असावेत असें डॉ. स्पूनर यांचें मत आहे. बंगाल, बिहार व ओरिसा या ठिकाणीं वस्ती केलेल्या या लोकांचा; तसेंच कांबोज, पारद व पल्हव यांचा मनुस्मृतींत निर्देश झाला आहे. हें सर्व इराण्यांचे वंशज आहेत असें पंडितांचें मत आहे.

ऋग्वेदांत वृत्रास दानव असें म्हटलें असून यजुर्वेदांत (५०·७२) व अथर्ववेदांत (४०·२३) हा शब्द शत्रु या अर्थी वापरला आहे. झेंदावेस्ता ग्रंथांतहि याच अर्थी सदर शब्द वापरला आहे, असें डॉ. हॉग म्हणतात. महाभारतांत (आदिपर्व ६७.) जरासंध हा पूर्वजन्मीं दानवाधिपति होता असें म्हटलें आहे. हाच जरासंध मगध देशाचा राजा असून, त्या देशास 'मग' यावरूनच तें नांव प्राप्त झालें असें भविष्यपुराणांत म्हटलें आहे.

**मगं ध्यायंति ते यस्मात्तेन**
**ते मगधाः स्मृताः**

या मगांचीं १८ कुळें या देशांत आलीं व ते वेदांचा विपरीत अर्थ करणारे आहेत असेंहि याच पुराणावरून दिसतें. मग लोक कंबरेभोंवतीं 'अव्यंगाचें' वेष्टण करीत. याला झेंद भाषेंत ऐव्याओंघेन व संस्कृतांत अव्यंग हें नांव असून हल्लीं पारशी लोक त्यास कुस्ति असें म्हणतात. त्यांच्यातील कुस्ति व सदरे धारणाचा विधि जवळजवळ आपल्या मौंजीबंधना सारखाच आहे. बाराशें वर्षांपूर्वी पारशी लोक आपल्या देशाचा त्याग करून या देशांत आले. तेव्हां त्यांच्यांत रूढ असलेली अग्निपूजा, वर्णव्यवस्था, (अथोर्नन, रथेष्टर, वस्टेरियस व हुताक्ष हें त्यांच्यांतील चार भेद ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र याच अर्थाचे आहेत.) सूर्यपूजा व आर्यांशीं जुळते असे आचारविचार पाहूनच त्यांना संजान येथें तत्कालीन राजानें आश्रय दिला.

**—कै. नाथमाधव**

# विलक्षण शक्तीचे हठयोगी

दत्ता मराठे

हठयोगानें माणसाला आपलें शरीर संपूर्णपणें ताब्यांत आणतां येतें. राजयोगानें माणूस स्वतःचें मन जिंकू शकतो. ज्यानें आपलें शरीर व मन हीं पूर्ण स्वाधीन करून घेतलीं आहेत असा योगी भौतिक सृष्टीवरहि ताबा मिळवूं शकतो. असा एखादा योगी भौतिक सृष्टीच्या नियमांच्या चौकटींत न बसणाऱ्या गोष्टी करून दाखवूं लागला, कीं आपण गांवढळ माणसें ' चमत्कार ! चमत्कार ! ' म्हणून ओरडत सुटतों. वास्तविक या घटनाहि नियमबद्धच आहेत. पण या घटनांमागील नियम हे स्थूल सृष्टींतले नसून सूक्ष्म सृष्टीतले असल्यामुळें आपल्याला अज्ञात असतात एवढेंच काय तें! अशा कांहीं योग्यांच्या विलक्षण गोष्टी आज मी सांगणार आहे.

' मानवी मनाचें सामर्थ्य ' या विषयावर अमेरिकेंत व्याख्यान देतांना स्वामी विवेकानंदांनीं आपले स्वतःचे कांहीं अनुभव सांगितले होते. ते सांगतांना स्वामीजी म्हणाले होते—

## अंतर्ज्ञानी मनुष्य

' एका वेळीं एका मनुष्याबद्दल माझ्या कानावर असें आलें कीं. कोणी त्या माणसाकडे मनांत कांहीं प्रश्न धरून गेला तर तो त्या प्रश्नांचीं उत्तरें ताबडतोब देतो; तसेंच पुढें होणाऱ्या कांहीं गोष्टीहि तो सांगतो. हें वर्तमान ऐकून त्या माणसाला पाहाण्याची जिज्ञासा माझ्या मनांत निर्माण झाली. कांहीं मित्रांबरोबर मी त्याच्याकडे गेलों. आमच्यापैकीं प्रत्येकजणाच्या मनांत त्याला कांहीं ना कांहीं विचारायचें होतें. आम्हांला जे प्रश्न विचारायचे होते ते कागदावर लिहून ते कागद आम्ही पाकिटांत घातले होते. आमच्यापैकीं एकाकडे पहिल्याबरोबर तो आमचे प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें सांगूं लागला. मग त्यानें एका कागदावर कांहीं मजकूर लिहून तो कागद एका पाकिटांत घालून तें बंद केलें. तें पाकीट माझ्यापुढें करून तो म्हणाला, 'यांत तुमच्या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरें आहेत. हें खिशांत घाला !' अशा रीतीनें त्यानें प्रत्येकाला त्याचे प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें दिलीं. नंतर त्यानें आम्हांला पुढें घडून येणाऱ्या कांहीं गोष्टीहि सांगितल्या. थोड्या वेळानंतर तो म्हणाला, ' कोणत्याहि भाषेंतला एखादा शब्द अथवा एखादें वाक्य आपल्या मनांत धरा.' त्याला संस्कृत भाषेचें ज्ञान मुळींच नव्हतें हें मला ठाऊक होतें. म्हणून एका संस्कृत ग्रंथांतील एक लांबलचक वाक्य

मी मनांत म्हटलें. नंतर तो मला म्हणाला, 'आतां आपल्या खिशांतला कागद बाहेर काढा.' मी कागद काढून पाहिला तों तें वाक्य त्या कागदावर बरोबर लिहिलेलें मला आढळलें! तो कागद सुमारें एका तासापूर्वी त्यानें लिहिला होता. आणि त्यांत असेंहि त्यानें लिहून ठेवलें होतें कीं, 'हे गृहस्थ पुढील वाक्य मनांत धरतील!' नंतर माझ्या एका स्नेह्याकडे वळून तो म्हणाला, 'तुम्हींहि एखादें वाक्य मनांत धरा.' माझ्या स्नेह्याला अरबी भाषेचें चांगलें ज्ञान होतें. त्यानें कुराणामधील एक वाक्य मनांत धरलें. त्या उत्तरें देणाऱ्या माणसाला अरबी भाषेचा गंधहि असण्याचा संभव नव्हता. तरीहि माझ्या स्नेह्यानें त्यांच्या सांगण्याप्रमाणें आपल्या खिशांतील पाकीट उघडून पहातां त्यालाहि तें वाक्य अचूक लिहून ठेवलेलें आढळलें! आमच्यापैकीं तिसरे एक डॉक्टर होते. त्यांनीं एका जर्मन वैद्यकीय ग्रंथांतलें वाक्य मनांत धरलें. आणि तेंहि अशाच रीतीनें त्यांच्याजवळ देऊन ठेवलेल्या कागदावर आगाऊच बरोबर लिहून दिलेलें आढळून आलें!

## अद्‌भुत फळें-फुलें

'दुसऱ्या एका प्रसंगीं कांहीं कामानिमित्त मी हैदराबादेस गेलों होतों. तेथें माझ्या ऐकण्यांत आलें कीं एक गृहस्थ हजारों प्रकारचे जिन्नस बसल्या जागीं काढून दाखवतो. हा गृहस्थ हैदराबाद येथें कांहीं व्यापारधंदा करून रहात असे. आम्ही त्या गृहस्थाकडे गेलों आणि कांहीं जिन्नस काढून दाखविण्याची त्याला विनंती केली. त्या दिवशीं तो गृहस्थ तापानें आजारी होता. एखाद्या सत्पुरुषानें स्पर्श केला असतां रोगग्रस्त मनुष्याचा आजार जातो असा आम्हां हिंदूंचा विश्वास आहे. त्याला अनुसरून तो गृहस्थ मला म्हणाला 'महाराज, माझ्या मस्तकावर आपला हात ठेवाल तर मोठी कृपा होईल.' मी त्याला म्हटलें, 'ठीक आहे. तुम्ही आपली विद्या आम्हांला दाखविली पाहिजे.' ही गोष्ट त्यानें कबूल केली. त्याच्या इच्छेप्रमाणें मी माझा हात त्याच्या मस्तकावर ठेवला. पुढें कबूल केल्याप्रमाणें थोड्या दिवसांनीं तो गृहस्थ मजकडे आला. त्यावेळीं तो धोतर नेसला होता व अंगावर थोडे कपडे होते. आम्ही त्याच्या अंगावरील सारे कपडे त्याला काढायला लावून ते बाजूला ठेवले. त्याचें नेसतें धोतर मात्र त्याच्या अंगावर राहूं दिलें. त्या दिवशीं थंडी फार होती म्हणून पांघरायला एक ब्लँकेट त्यानें मजपासून मागून घेतलें. तें ब्लँकेट पांघरून तो खोलीच्या एका कोंपऱ्यांत जाऊन बसला. त्या खोलींत त्या वेळीं सुमारें पंचवीस माणसें होतीं. तो गृहस्थ म्हणाला, 'बोला, तुम्हांला काय पाहिजे तें!' आम्हीं सर्वांनीं कांहीं फळांचीं नांवें लिहिलीं. त्यांतील कित्येक फळें जवळपासच्या प्रदेशांत न मिळणारीं अशींहि होतीं. नंतर हीं नांवें लिहिलेले कागदाचे कपटे आम्ही त्याजपाशीं दिले. थोड्याच वेळांत ब्लँकेटखालून फळें बाहेर येण्यास सुरवात झाली! द्राक्षाचें घडचें घड आणि नारिंगें वगैरे इतर फळें भराभर बाहेर पडूं लागलीं. शेवटीं इतकीं फळें बाहेर पडलीं कीं त्या सर्वांचें वजन केलें असतें तर तें

त्या मनुष्याच्या वजनाच्या दुप्पट झालें असतें ! तीं फळें त्यानें आम्हांला खायला दिली. परंतु कित्येकांनी ती खाण्याचें नाकारले. त्यांत कांहीं जादू असेल असें ते म्हणूं लागले. पण तो गृहस्थ जेव्हां तीं फळें स्वतःच खाऊं लागला तेव्हां बाकीच्या सर्वांनींहि त्याजवर खुशाल ताव मारला. त्यापासून कोणाला कांहीं इजा वगैरे पोंचली नाहीं.

'शेवटीं त्या गृहस्थानें कांहीं सुंदर गुलाबाचीं फुलें काढलीं ! प्रत्येक फूल अगदीं पूर्ण फुललेलें असून जसें काय नुकतेंच तोडलेलें असावें तसें दिसत होतें. त्यावरील दंवाचे बिंदूहि जसेच्या तसे असून सर्व पाकळ्या अगदीं ताज्या टवटवीत दिसत होत्या. एखादी पाकळीसुद्धां गळलेली नव्हती अगर चुरून खराब झाली नव्हती. तीं फुलेंहि थोडींथोडकीं नव्हती. भाराभर फुलें त्यानें आणलीं होतीं..'

## स्वामी नरसिंह

मनांतलें ओळखणाऱ्या योग्याचा प्रकार बघितलात. खाण्याचे विविध जिन्नस निर्माण करणाऱ्या योग्याचा नमुना पाहिलात. आतां वाटेल तो जिन्नस खाणाऱ्या योग्याची नवलकथा ऐका. ही नवलकथा कांहीं वर्षांपूर्वी 'अमृतबझारपत्रिका' या प्रसिद्ध दैनिकांत प्रसिद्ध झालेली असून, या वृत्तांतांत वर्णन केलेला प्रयोग प्रत्यक्ष जातीनें हजर राहून पाहाणाऱ्या वार्ताहरानें ही हकीकत लिहिली आहे. तो म्हणतो.

'स्वामी नरसिंह यांना 'सर्वभक्षक' अशी यथार्थ पदवी लाभलेली आहे. ही मोठी विलक्षण व्यक्ति आहे. स्वामी नरसिंह मध्यम वयाचे असून अंगानें चांगले जाडजूड आहेत. मस्तकावर काळ्याभोर जटा, छातीपर्यंत रुळणारी दाढी आणि दाट काळेभोर डोळे यांनीं त्यांची मुद्रा तेजगंभीर दिसते. त्यांचें बोलणें चालणें आदबशीर आहे.

'एका दुपारीं तेजनारायण ज्युबिली कॉलेज हॉलमध्यें त्यांचे सर्वभक्षणाचे प्रयोग होते. मी हॉलमध्यें जाऊन पोंचलों तेव्हां सबंध हॉल प्रेक्षकांनीं गच्च भरून गेला होता. त्यांतून वाट काढून मी पुढेंपर्यंत जाऊन पोंचलों. स्वामी एका खुर्चीवर बसले होते. त्यांच्या समोरच्या टेबलावर नाना प्रकारचीं ॲसिडें, विषें यांच्या कुप्या, कंदिलाच्या फुटक्या कांचा, दगड, कोळसे वगैरे 'खाद्य' पदार्थ ठेवलेले होते !

'हॉलमध्यें गोळा झालेल्या प्रेक्षकांत अनेक नाणावलेले डॉक्टर, वकील आणि शहरांतील अनेक नामवंत गृहस्थ बसलेले होते. मी जवळ जाऊन स्वामी नरसिंह यांना अभिवादन केलें. टेबलाकडे बोट दाखवून मी त्यांना विचारलें 'हें काय काय आहे ?' स्वामींनीं एक कुपी उचलून वर उंच धरली व म्हटलें, 'हें सल्फ्यूरिक ॲसिड !' नंतर एकेक कुपी दाखवीत ते म्हणाले, 'हें नायट्रिक ॲसिड, हें हायड्रोक्लोरिक ॲसिड, हा पारा, हें कार्बोलिक ॲसिड !' मी म्हटलें, हें सारें तुम्हीं घेणार ?' स्वामी हसून म्हणाले, हो ! तुम्हीं डाळ-भात कसा खातां आनंदांत ! तसेंच हें सारें खाऊनपिऊन दाखविणार आहें !'

## ॲसिड खाल्लें!

'थोड्याच वेळात प्रयोगाला सुरुवात झाली. स्वामी उठून उभे राहिले. त्यांनीं पारा असलेली बाटली उचलून ती प्रेक्षकांना दाखविली. कांहीं डॉक्टरांनीं ती उघडून तो पाराच आहे अशी खात्री करून घेतली. स्वामींनीं ती बाटली उपडी करून चमचाभर पारा आपल्या उजव्या तळहातावर ओतून घेतला, तोंडांत टाकला आणि पटकन् गिळून टाकला! स्मितमुखानें तें म्हणाले, 'पारा फार जड असतो. तो तोंडांत राहूं शकत नाहीं. आतां तो खाली जात आहे. गेला'— असें म्हणून त्यांनीं बाजूला ठेवलेला एक कमंडलु उचलला आणि त्यांतून ते थोडें पाणी प्याले.

'नंतर स्वामींनीं सल्पयूरिक ॲसिडची बाटली घेतली घेतली. ते म्हणाले, 'हें सल्फ्यूरिक ॲसिड आहे. हें मी आतां पिणार आहे.' परत त्यांनीं चमचाभर सल्फ्यूरिक ॲसिड हाताच्या तळव्यावर ओतून घेतले आणि एखादा लहान मुलगा मध चाटतो तसें चाटून खाल्लें! कांहीं प्रेक्षकांचा यावर विश्वास बसेना. तें सल्फ्यूरिक ॲसिड कशावरून, असें ते म्हणूं लागले. एका बंगाली कंपाउंडरनें आपल्या दवाखान्यांतून सल्फ्यूरिक ॲसिड भरून एक कुपी आणली होती. तो म्हणाला, 'मी आणलेलें ॲसिड पिऊन दाखवाल का?' स्वामींनीं तें आनंदानें कबूल केलें. तें सल्फ्यूरिक ॲसिडच आहे याबद्दल खात्री पटविण्यासाठीं त्यांनीं त्यांतील कांहीं थेंब एका तांब्याच्या नाण्यावर टाकले आणि त्या नाण्यावर होणारी प्रक्रिया दाखविली. तें सल्फ्यूरिक ॲसिडच आहे. अशी तेथें जमलेल्या डॉक्टरांची खात्री पटली. स्वामींनीं तें ॲसिड हातावर ओतून घेतलें आणि पिऊन टाकलें. ॲसिडनें वास्तविक तळहात आणि ओठ भाजून निघायचे. पण तसा कांहीं परिणाम स्वामींवर झालेला दिसला नाहीं!

'मग स्वामींनीं कांचेचा एक तुकडा घेतला आणि कराकर खाऊन टाकला. त्यांच्या दांतांखालीं कांच फुटत तुटत असतांना तिचा आवाज सर्वांना ऐकूं येत होता त्यांनीं चावूनचावून कांचेची भुकटी केल्यावर तोंड उघडून आपली जीभ दाखवली. जिभेवर कांचेचा चुरा स्पष्ट दिसत होता! त्यांनीं तो शांतपणें गिळून टाकला. नंतर पुन्हा तो कमंडलु उचलून ते तीनचार घोट पाणी प्याले.

'त्यानंतर नायट्रिक ॲसिडची पाळी आली. एका हातरुमालावर त्या ॲसिडचे कांहीं थेंब त्यांनीं टाकून दाखविले. ॲसिड पडलेला रुमालाचा भाग जळून गेला. प्रेक्षकांनींहि ती बाटली घेऊन रुमालावर त्यांतील थेंब टाकून तें नायट्रिक ॲसिड असल्याची खात्री करून घेतली. पूर्वीप्रमाणेंच स्वामींनीं हातावर तें ॲसिड ओतलें आणि चाटून टाकलें!'

'एक प्रेक्षक म्हणाला, 'हातावर कां ओतून घेतां तुम्ही ॲसिड? त्या कुपींतूनच सरळ ॲसिड तुमच्या तोंडांत ओतलें तर प्याल?' स्वामी 'होय' म्हणाले आणि तोंड उघडून उभे राहिले. कुपींतून ॲसिड त्यांच्या तोंडांत ओतण्यांत

आले. तें पिकून कैरी खाल्ल्यावर मिटक्या माराव्यात तशा त्यांनीं मिटक्या मारल्या ! आणि कमंडलूंतील थोडें पाणी ते पुन्हा प्याले.

## हें कसलें विष ?

‘एका मुसलमान तरुणानें कसलासा द्रव भरलेली दोन औंसांची एक बाटली बरोबर आणली होती. त्यानें तो द्रव पिण्याचें स्वामींना आव्हान दिलें. स्वामी म्हणाले, ‘हें कसलें विष आहे ?’ तो म्हणाला, ‘मी नांव नाहीं सांगणार ! एका युनानी दवाखान्यांतून मी तें आणलें आहे.’ स्वामी म्हणाले, ‘मी तें घेईन. पण त्याचें नांव मला कळलें पाहिजे. नांव समजलें नाहीं तर तें मला घेतां यायचें नाहीं. तें एक जलाल विष आहे एवढेंच तो सांगे. स्वामी विचार-मग्न मुद्रेनें त्या बाटलीकडे थोडा वेळ पाहात राहिले आणि नंतर म्हणाले, ‘समजा, मी हें घेतलें तर तूं मला बक्षीस काय देशील ?’

‘या प्रश्नानें तो तरुण थोडा बावरला स्वामींना बक्षीस द्यायला त्याजपाशीं कांहीं नव्हतें. स्वामी हंसले आणि ती बाटली हातावर ओतून त्यांनीं त्या द्रवाची चव घेतली. नंतर ते म्हणाले, ‘हं ! वास नाहीं, चव नाहीं ! हें साधें पाणी आहे !’

‘नंतर स्वामींनी कांहीं दगड खाल्ले ! अर्ध्या इंचाहून अधिक लांबीचे लोखंडी खिळे त्यांनीं मटकावले ! अखेरीस भयप्रद जातीच्या नागाचें विष त्यांनीं दाखविलें आणि चाटून खाल्लें ! जिवंत नाग किंवा इतर विषारी जिवाणूं कोणी पकडून आणलें तर आपण त्याच्याकडून स्वतःला दंश करून घेण्यास तयार आहों, असेंहि त्यांनीं जाहीर केलें !

‘दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी स्वामींना त्यांच्या निवासस्थानीं भेटायला गेलों. आदल्या दिवशीं तो विलक्षण ‘आहार’ घेऊनहि स्वामी चांगले मजेंत होते ! मी त्यांना म्हटलें, ‘काल इतकी महाविषें घेऊनहि तुमच्या शरीरावर त्याचा यत्किंचित् परिणाम दिसत नाहीं याचें रहस्य काय ?’ स्वामी हंसून म्हणाले, ‘यांत मोठेसें रहस्य नाहीं मी हें हठयोगाच्या अभ्यासानें करूं शकतों. यांत कांहीं हातचलाखी किंवा जादू मुळींच नाहीं. हठयोगांतर्गत प्राणा-यामाचा मी अभ्यास केलेला आहे. प्राणा-वर विशिष्ट अभ्यासानें विजय मिळविला असल्यामुळें हीं विषें पोटांत गेलीं तरी मला कांहीं इजा न करतां तीं बाहेर पडून जातात.’

‘सर्वभक्षक नरसिंहस्वामींनीं आपल्या पोटाचे क्ष–किरण फोटो मला दाखविले. त्यांत कांहीं खिळे, फुटक्या कांचा वगैरेंच्या छाया दिसत होत्या !’

(मासिक ‘मोहिनी’ वरून)

---

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘लाय सॉफ तेल’ वापरा .

# भगवान् गौतमबुद्ध

अडीच हजार वर्षांपूर्वी एका मंगळवारीं वैशाखी पौर्णिमेला भगवान गौतम बुद्धाचा जन्म झाला. त्याला परमज्ञानाचा साक्षात्कार झाला त्या दिवशीं वैशाखी पौर्णिमाच होती आणि त्याचें महानिर्याणहि वैशाखी पौर्णिमेलाच झालें. जन्म, ज्ञान—साक्षात्कार आणि अवतारसमाप्ति या तिन्ही वेळां असलेली ही वैशाखी पौर्णिमा बौद्धांच्या दृष्टीनें परमपवित्र तिथि मानली जाते.

काशीपासून ईशान्येस शंभर मैलांवर आणि हिमालयापासून चाळीस मैलांवर, नेपाळच्या तराईत रोहिणी नदीच्या तीरावर कपिलवस्तु नांवाची राजधानी होती. शाक्य कुलांतील राजा शुद्धोदन हा तेथें राज्य करीत होता. शुद्धोदनाची राणी माया हिच्या उदरीं सिद्धार्थाचा—भगवान् बुद्धांचा—जन्म झाला. कपिलवस्तूनजीक असलेल्या लुंबिनी—वनांत बुद्धांचा जन्म झाला, अशी साधार माहिती सांपडते.

## सिद्धार्थाचें सामर्थ्य

राजपुत्र सिद्धार्थ मोठा झाल्यावर शुद्धोदन राजानें त्याचा विवाह करण्याचें ठरविलें. अनेक शाक्यकन्या राजपुत्राला दाखविण्यांत आल्या. त्यांतील गोपा नांवाची मुलगी त्यानें पसंत केली. राजानें त्या मुलीला मागणी घातली. पण मुलीचा बाप दण्डपाणि यानें असें कळविलें कीं, मुलगा कोणत्या शास्त्रकलांत प्रवीण आहे तें पाहिल्याशिवाय मुलगी देऊं नये, असा आपला कुलसंप्रदाय आहे.' त्याप्रमाणें एकदां तलवार, धनुष्यबाण, कुस्ती, हत्ती चालविणें इत्यादि विद्यांच्या कौशल्याचे सामने झाले. त्यांत सिद्धार्थानें सर्वांहून अधिक प्रावीण्य दाखविलें.

सिद्धार्थाचा प्रतिस्पर्धी देवदत्त हा सामन्यासाठीं जात असतां समोरून एक हत्ती आला. त्याला पाहून देवदत्तानें एका हातानें हत्तीचा सुळा धरून दुसऱ्या हातानें त्याच्या श्रीमुखांत इतक्या जोरानें प्रहार केला कीं, तो हत्ती तत्काळ गतप्राण होऊन पडला! मागून सुंदरानंद नांवाचा राजपुत्र आला. त्याला ही हकीकत समजली तेव्हां देवदत्तानें हे चांगलें केलें नाहीं असे उदगार काढून त्यानें हत्तीचें शेंपूट धरून त्याला रस्त्याच्या बाजूस आणून टाकलें. सुंदरानंदाच्या मागून सिद्धार्थ रथांत बसून आला. त्याला हत्तीची ही हकीकत कळली. एवढा मोठा प्राणी रस्त्याच्या कडेला सडत पडला तर

लोकांना त्रास होईल असें म्हणून त्यानें रथाबाहेर पाय काढला आणि अंगठा व बोट यांच्या चिमटींत हत्तीची शेपटी धरून त्याला इतक्या जोरानें दूर भिरकावलें कीं तो हत्ती सात तट व सात खंदक यांच्या पलीकडे दोन मैलांवर जाऊन पडला !

## जगांतील दुःखदर्शन

सिद्धार्थांच्या जन्मवेळीं राजज्योतिषानें असें भविष्य वर्तविलें होतें कीं, हा मुलगा मोठा धर्मसंस्थापक होईल. मानवी दुःख पाहून सिद्धार्थाला वैराग्य उत्पन्न होईल आणि तो सर्वसंगपरित्याग करून निघून जाईल, या भयानें शुद्धोदनानें तीन राजवाडे सर्व सुखसोयींनीं समृद्ध करून तेथें सिद्धार्थाला ठेवलें होतें. जगांतील दुःखांचें त्याला यत्किंचितहि दर्शन होऊं नये अशी राजानें कटाक्षानें काळजी घेतली होती. परंतु एकदां सिद्धार्थ रथांतून जात असतां, त्याला एक रोगग्रस्त माणूस दिसला आपल्यालाहि केव्हांतरी रोग घेरणार असें सिद्धार्थाच्या मनांत आलें. तोंच पुन्हा एक जराजर्जर माणूस त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां आपणहि पुढें असेच म्हातारे होणार हें त्याच्या ध्यानीं आलें. तिसऱ्या वेळीं त्यानें एक प्रेत जाळायला नेत असल्याचें पाहिलें. त्यावरून स्वतःलाहि असाच केव्हांतरी मृत्यु येणार हें त्याला उत्कटतेनें जाणवलें.

जगांतील मानवी दुःखें पाहून राजपुत्राचें मन उद्विग्न झालें आणि त्यानें संसारत्याग करून दुःखनिवृत्तीचा परमोपाय शोधून काढण्याचें ठरविलें.

## कठोर तपश्चर्या

आपल्या निश्चयानुसार एका रात्रीं तो कोणाला नकळत राजवाड्यांतून बाहेर पडला आणि भिक्षावृत्तीनें संचार करूं लागला. त्यानें अनेक धर्मज्ञ गुरूंच्या उपदेशानुसार तपाचरण करून पाहिलें; पण त्याला कैवल्यप्राप्ति झाली नाहीं. अखेरीस तो गयेला गेला आणि तेथें त्यानें सहा वर्षेंपर्यंत कठोर तपश्चर्या केली. या तपानें त्याचें शरीर अत्यंत कृश झालें. त्यानें आपला आहार इतका कमी करीत आणला होता, कीं कांहीं दिवस रोज फक्त एक तांदूळ खाऊन तर कांहीं दिवस फक्त एक तीळ खाऊन तो रहात असे, असें ग्रंथांतरीं वर्णन आहे. अखेर देहदंडन करून अज्ञाननिरास होत नाहीं, अशी बुद्धाची खात्री झाली आणि त्यानें पुनः अन्नग्रहण करण्यास सुरुवात केली. नंतर बोधिवृक्षाखालीं बसून ज्ञानप्राप्ति झाल्याखेरीज आसन सोडायचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. तेथें आसनस्थ होऊन चिंतन करीत बसलेला असतां, सातव्या दिवशीं त्याला परमज्ञानाचा,—जरा–मरण–दुःख यांच्या परिहार–मार्गाचा साक्षात्कार झाला. राजपुत्र सिद्धार्थ 'भगवान्' बुद्ध झाला.

ज्ञानप्राप्तीनंतर ४५ वर्षेंपर्यंत धर्मोपदेश करीत बुद्ध ठिकठिकाणीं फिरला. वयाच्या ८० व्या वर्षी कुशनगर येथें बुद्धानें महासमाधि–प्रवेश केला.

## बुद्धाचें अवतारकार्य

भगवान् बुद्धाच्या अवतारकार्याविषयीं स्वामी विवेकानंद म्हणतात,—

'केवळ परार्थ—चिंतन, निःसीम त्याग आणि अत्यंत निरपेक्ष बुद्धि यांचा मनोहर संयोग बुद्धाखेरीज इतर कोणातहि तुम्हांला आढळणार नाहीं. अत्यंत उच्च प्रतीचें तत्वज्ञान सांगत असतां नीचतम प्राण्याबद्दलहि अत्यंत कळकळ त्याच्या अंतःकरणांत वास करीत होती. 'मी' आणि 'माझें' या शब्दांचे अर्थहि तो विसरला होता. कर्म—योगाचा शुद्ध आदर्श पहावयाचा असेल तर तुम्ही बुद्धाकडे पहा. अहंकाराची छटासुद्धां त्याच्या हृदयांत नव्हती. बुद्धि आणि अंतःकरण या दोहोंचीहि परिपक्व दशा एकत्र कोठें पहाणें असेल तर ती बुद्धावांचून दुसऱ्या कोठेंहि आढळणार नाहीं. मनुष्यजात सन्मार्गवर्ती व्हावी एवढ्याचसाठीं खटपट करणारा असा हा पहिला महात्मा होय...'

## विवेचकबुद्धीवर भर

अंधश्रद्धेनें कसलींहि मतें उराशी न बाळगतां आपल्या विवेचक बुद्धीच्या कसोटीवर घांसून—पारखून कोणतेंहि तत्त्व ग्रहण करावें असा बुद्धाचा सदैव उपदेश असे. एकदां तो आपल्या शिष्यांना म्हणाला,

'अमुक गोष्ट अमक्या जुन्या ग्रंथांत सांगितलेली आहे एवढ्यावरूनच ती सत्य म्हणून ग्रहीत धरूं नका. तुमचे आप्तेष्ट अमुक गोष्ट खरी मानतात, एवढ्यावरूनच ती तुम्ही खरी मानूं नका. लहानपणापासून वडिलांनीं अमुक गोष्ट सांगितली एवढ्यावरूनच ती ग्राह्य समजूं नका. जें जें तुम्हीं ऐकाल तें तें सर्व आपल्या बुद्धीच्या कसोटीवर घांसून पहा. जर उत्तम ठरलें तर तें खरें मानां आणि त्याचा प्रत्यक्ष आचार करा.'

विविध दृष्टान्तांनीं आणि युक्तिवादांनीं आपलें म्हणणें दुसऱ्याला पटवून देण्याची अप्रातिम हातोटी बुद्धाला साधलेली होती.

## सर्व जाती समान

एकदां अस्सलायन नांवाचा शिष्य बुद्धाला म्हणाला, 'भगवन्, ब्राह्मण असें म्हणतात कीं ब्राह्मण हे सर्वांत उच्च वर्णाचे आहेत आणि इतर वर्ण हे त्यांच्याहून कनिष्ठ आहेत—ब्राह्मण पवित्र आहेत आणि इतर अपवित्र आहेत. याविषयीं आपलं काय म्हणणं आहे!!

बुद्ध म्हणाला—

'असें समजा, एका क्षत्रिय राजानें ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादि सर्व वर्णांची मिळून शंभर माणसें एकत्र केलीं. नंतर प्रत्येकानें शाल, चंदन अथवा पद्मक या


लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
मे. कांचनलाल वाडीलाल कं.,
दवाबझार, मुंबई २

झाडांची एक-एक रवी घेऊन ती दुसऱ्या लांकडाच्या उखळांत फिरवून घर्षण करून अग्नि उत्पन्न केला. याप्रमाणें चांडाळ, व्याध बुरुड, रथकार, शूद्र इत्यादि सर्व जातींच्या लोकांनीं अग्नि उत्पन्न केला. तर ब्राह्मणांनीं चांगलीं लांकडें घेऊन तयार केलेला अग्नि जास्त तेजस्वी आणि प्रकाशमान् असेल काय? आणि इतरांनीं तयार केलेला अग्नि हा मंद व मलूल असेल काय? तो अग्नीचीं सर्व कार्यें करणार नाहीं काय? विविध जातींनीं निर्माण केलेला अग्नि हा जसा एकच आहे, त्यांत फरक नाहीं, तसाच जातीं-जातींतहि मूलतः फरक नाहीं.'


**Fashion, A Human Urge**
**FOR 5000 Years**
**Now Transform our Faces by Means of Spectacles**
They give you the widest fild of view obtainable
The Choise is a matter of Personal Preference
Visit :—
**SHENDE & Co.**
**OPTICIANS**
Borbhat Lane, Girgaum,
Bombay 4.


## निष्फळ अध्यात्मचर्चा

एकंदां एक शिष्य बुद्धाला म्हणाला, 'महाराज, जन्म, मृत्यु, अध्यात्म इत्यादि विषयासंबंधीं मला ज्ञान सांगा.'

बुद्ध म्हणाला,—

'असल्या विषयांचा कीस काढीत बसण्यापासून फायदा कोणता? एका माणसाला एक विषारी बाण लागला, तेव्हां त्याच्या आतेष्टांनीं त्याला वैद्याकडे नेलें. वैद्य बाण उपटून काढीत असतां तो मनुष्य ओरडून म्हणाला, 'थांबा! हा बाण मारला कोणी हें प्रथम शोधून काढा! बाण मारणारा हा कोणत्या वर्णाचा व कोणत्या कुळांतला होता याचा शोध करा! तो उंच होता कीं ठेंगू, सुरूप होता कीं कुरूप, याची चौकशी करा! तो बाण कशा प्रकारचा आहे, कोणी केला आहे याचा तपास करा. या सर्व गोष्टी समजल्याशिवाय मी बाण काढूं देणार नाहीं.' आतां मला सांगा, बाण काढण्यासाठीं या प्रश्नांचीं उत्तरें आवश्यक आहेत का? तीं मिळविण्याचा प्रयत्न करीत राहिलें तर तीं मिळविण्या-पूर्वींच विषानें तो माणूस मरूनहि जाईल. यासाठीं दुःखमुक्तीचा उपाय माणसानें पहावा. जीवनाची सार्थकता ज्यांत आहे त्याचा आचार करावा. फाल्तू गोष्टींच्या विचारानें त्यानें आपलें डोकें निष्कारण पिकवून घेऊं नये.

## खरी दया कशी असते?

एकदां बुद्धाला आडवेतिडवे प्रश्न करून त्याची फजिती करण्याच्या हेतूनें राजा अभय हा बुद्धाकडे आला. त्यानें

बुद्धाला विचारलें, 'आपण कटु भाषण कधीं करतां कीं नाहीं?'

बुद्ध म्हणाला, 'होय, मी कधीं कधीं कटु भाषण करतों.'

राजा अभय म्हणाला, 'मग सामान्य माणसें आणि आपण यांत फरक तो काय राहिला? सामान्य माणसांनीं कटु भाषण केलें तर तें स्वाभाविक आहे. पण आपल्यासारख्या थोर पुरुषांनीं वस्तुतः सदैव मधुरभाषी असलें पाहिजे. नव्हे काय? दया आणि अनुकंपा यांनीं ज्यांचें अंतःकरण भरलेलें आहे त्यांच्या तोंडून कटु शब्द कसे निघतील?'

अभय राजाच्या मांडीवर त्या वेळीं त्याचा लहान मुलगा बसलेला होता. त्याच्याकडे बोट दाखवून बुद्धानें विचारलें, 'या मुलानें तुझ्या अथवा दाईच्या निष्काळजीपणामुळें अज्ञपणानें तोंडांत एखादा लांकडाचा तुकडा अथवा दगड घातला तर तूं काय करशील?'

राजा म्हणाला, 'मी त्याच्या तोंडांत बोट घालून तो काढून टाकीन.'

'त्या मुलानें त्या वेळीं डोकें हलविलें तर?'

'तर एका हातानें त्याचें डोकें पकडून दुसऱ्या हातानें तो तुकडा अथवा दगड बाहेर काढीन.'

'हें करतांना तो दगड त्या मुलाच्या तोंडाला लागून रक्त आलें तर?'

'तरीहि मी तिकडे लक्ष न देतां दगड बाहेर काढीन.'

'पण हें करतांना त्या मुलाला इजा झाली, त्याच्या दांतांतून रक्त आलें तर तो तुझा क्रूरपणा नव्हे काय?'

'मुळींच नव्हे! त्या मुलाला थोडीशी इजा झाली तरी दगड काढून टाकल्यामुळें त्याला एरवीं होणारी मोठी इजा टळेल. तेव्हां त्यासाठीं थोडा कठोरपणा करणें म्हणजे क्रूरपणा नसून ती दयाच आहे.'

बुद्ध म्हणाला, 'राजा, त्याचप्रमाणें कोणताहि खोटा, चुकीचा, अपायकारक व दुसऱ्याला दुःखप्रद होईल असा शब्द मी उच्चारीत नाहीं; परंतु जर एखादा शब्द खरा, हितकर व सुपरिणामी आहे अशी माझी खात्री असेल तर मात्र तो दुसऱ्याला अप्रिय व दुःखकर वाटला तरी उच्चारणें हें योग्यच होय असें मी समजतों. असें मी कां करतों? तर असें कटु भाषण करणें म्हणजेच त्या अज्ञ माणसाला खरी दया दाखविणें आहे असें मला वाटतें म्हणून!'



# संत खेमदासजी

अनुवादक—भवानीशंकर नीळकंठ वागळे

संत खेमदासजी महाराज बाराबंकी जिल्ह्यांत असलेल्या मधनापुर नांवाच्या एका गांवांत राहत होते. ते कान्यकुब्ज ब्राह्मण होते. त्यांच्या बाल्यकाळाची व मातापित्यांची माहिती उपलब्ध नाहीं. तरुणपणीं त्यांनीं एका ब्रह्मचारी साधूपाशीं ज्ञानोपदेश घेऊन तपश्चर्या सुरू केली. ते गांवाच्या वेशीबाहेर राहून उन्हाळ्यांत उन्हांत, पावसाळ्यांत उघड्या मैदानांत व हिंवाळ्यांत कंबर-भर पाण्यांत उभे राहून तपश्चर्या करीत असत. त्यांचा रोजचा आहार म्हणजे कडुलिंबाचीं पानें व मिरच्या हा होता. या स्थितींत बारा वर्षें उलटलीं, परन्तु ईश्वरी साक्षात्कार झाला नाहीं. त्याच समयाला संत जगजीवन स्वामीजींची ख्याति सर्वत्र पसरली होती. संत खेमदासजींच्या कानावर स्वामीजींचे नांव जातांच त्यांनीं स्वामीजींच्या सेवेस उपस्थित राहून, त्यांच्याकडून मंत्रोपदेश घेण्याची इच्छा प्रगट केली. संत जगजीवन स्वामीजींनीं म्हटलें, 'आपण ब्राह्मण असून तपस्वी आहांत. मी गृहस्थाश्रमी व क्षत्रिय आहे. मी आपणास मंत्र कसा बरें देऊं शकेन?' परंतु संत खेमदासजीनीं हट्टच धरल्या-नंतर स्वामिजींनी प्रसन्न होऊन, त्यांना मंत्रोपदेश दिला व अन्नाचा आहार घेण्यास सांगितलें. त्यानंतर स्वामीजींनीं संत खेमदासजींना कांहीं दिवस स्वतःकडे ठेऊन घेतलें व सत्संगाच्या सान्निध्यांत असतांना भजनाची युक्ति व ईश्वर-साक्षात्काराचें साधन यांची त्यांना सूक्ष्म माहिती दिली. त्यानंतर संत खेमदास-जींनीं हरिसंकरी नांवाच्या एका गांवांत राहून अखंड भजन सुरू केलें आणि तेंच त्यांना ईश्वरसाक्षात्कार होण्यास कारणीभूत झालें. त्यांचे कांहीं शिष्यहि सिद्धसंत झाले. त्यांनीं ईश्वरभक्ति व प्रेम विषयावर तीन बृहद्‌ग्रंथ रचिले आहेत. काशीखंड, (२) तत्वसार दोहावली व (३) शद्वावली हे ते तीन ग्रंथ होत. या तीन ग्रंथाशिवाय त्यांनीं पुष्कळ स्फुट पदें रचिलीं आहेत. याप्रमाणें बराच समय परोपकार करून वि. सं. १८३० सालीं संत खेमदासजींनी इहलोक सोडला. त्यांच्या कवितेचा एक नमुना खालीं उद्धृत केला आहे.

पार करै प्रभु नाम तुम्हार।  
गज गतिकाकी सुनी पुकार,  
नामसे तरे अधम अधिकार॥  
नाम बेधिगा मिटा विकार,  
कितन्यो पतित पतंगी तार॥  
हमरी बैर मौन है बैठ्यो,  
कब हुँ न काहुक दोष निहार॥  
'दास ख्याम' के है अतिबार,  
तरबै प्रभुजीके परे दुवार॥

---

# श्रीक्षेत्र गाणगापूर येथील

# पंचशताब्दि महोत्सव

अलीकडेच गाणगापूर येथें श्रीनृसिंहसरस्वती महाराज यांच्या ५०० व्या पुण्यतिथीनिमित्त थाटामाटाचा महोत्सव साजरा झाला. या महोत्सवांत शिर्डी येथील साईबाबा संस्थानचे एक विश्वस्त श्री. श्री. बा. देव हे दोन दिवस गाणगापुरला जाऊन राहिले होते. त्यांनीं दिलेला त्या दोन दिवसांतील महोत्सवाचा हा प्रसन्न वृत्तांत वाचकांना हृदयंगम वाटेल....

श्री नृसिंहसरस्वती महाराज, क्षेत्र गाणगापूर ह्या श्रीदत्तावतार संतांनीं समाधि घेतल्यास गेल्या माघ व. प्रतिपदेस ५०० वर्षें झालीं. शके १८३० च्या माघ वद्य प्रतिपदेस त्यांनीं संगमावर पुष्पासन घालून प्रयाण केलें व आपण निजानंदास पोहोंचल्याची खूण व प्रसाद म्हणून पुष्पें येतील असें सांगितलें; बहुधान्य नामसंवत्सरीं, बृहस्पति कन्यागतीं असतां माघ व० १ ला श्रीसद्गुरुंचें हें निर्याण झालेलें असल्यामुळें श्रीदत्तभक्त त्या दिवशीं त्यांची पुण्यतिथि पाळतात; पाताळगंगेच्या पैलतीरावर, सिद्ध सरस्वती (ह्या सिद्धसरस्वतींनेंच आपल्या नामधारक शिष्यास श्रीगुरुचरित्र कथा सांगितली आणि हा नामधारक म्हणजे सायदेवाचा वंशज सरस्वती गंगाधर होय), सायंदेव, नंदी कवीश्वर व नरहरी कवीश्वर होते व त्या चौघांनीं श्रीगुरुदेवांची अंतिम स्पर्शानें पावन झालेली शेवतीची फुलें प्रसाद म्हणून वांटून घेतली. ह्या सर्व गोष्टींना शके १८८० च्या माघ व. १ ला ५०० वर्षें झालीं. म्हणून श्रीगाणगापूर क्षेत्रीं 'श्रीनृसिंह सरस्वती पंचशताब्दि उत्सव' एकंदर सात आठवडे साजरा करण्यांत आला होता. दि. ११ जानेवारी १९५९ पासून २८ फेब्रुवारी १९५९ पर्यंत हा उत्सव साजरा झाला. उत्सव समितीचे अध्यक्ष संतवर्य श्रीदत्तावतार माणिक प्रभूंच्या वंशापैकीं श्रीमार्तण्ड प्रभू यांच्या नात्यांतील श्री. प्रभुदासजी महाराज देशपांडे हे होते. श्री. प्रभुदासजी तथा अप्पासाहेब देशपांडे हे मागील श्रीपुण्यतिथीच्या उत्सवाला शिर्डी येथें आले होते व त्यांनीं उत्सवाची कल्पना व्यवस्थापक समितींतील सदस्यांना दिली होती व सवड असेल त्याप्रमाणें सभासदांनीं श्रीगाणगापूर येथें येऊन उत्सवाचा सोहळा जरूर निरीक्षण करावा असें आग्रहानें सांगितलें होतें.

शिर्डी व्यवस्थापक समितीनें वरील कार्यास ५०१ रु. ची देणगी दिली होती व होणाऱ्या उत्सवास संस्थान तर्फे, लेखक, डॉ. दाभोळकर, हरीभाऊ शेळके, रावसाहेब गोंदकर व राजाराम कोते पाटील

ह्यांनीं गाणगापुरास जावें असें ठरविलें होते.

वरील ठरावाप्रमाणें ठाण्याहून प्रस्तुत लेखक आणि आप्तेष्ट मंडळी व वांद्र्याहून डॉ. दाभोळकर व त्यांच्या पत्नी अशी मंडळी दि. १३–२–५९ ला मुंबईहून मद्रास मेलने निघाली व सकाळीं १० वाजतां गाणगापूर स्टेशनवर पोहोंचली. तेथून बस मिळून गाणगापूर गांवांत पोहोंचावयास १२ वाजले.

अमरजा नदीच्या कांठावर एका झाडाच्या पाराभोंवती एक मंडप घातला होता; व तेथेंच चौघड्याची व्यवस्था केली होती. नदीलाच पंप लावून व २–४ ठिकाणीं हौद बांधून पाण्याची तात्पुरती व्यवस्था केली होती; भोजनाकरितां एक मोठा मंडप घातला होता; यज्ञाकरितां एक स्वतंत्र मंडप होता व त्या मंडपाला श्रीसाई-मंडप' असें नांव दिलें होते. ह्या मंडपांत चारी वेदांचे यज्ञ व स्वाहाकार झालें. चारी वेदांचे ब्राह्मण आले होते व त्या मंडपांत श्रीप्रभुदासजी देशपांडे यांच्या समोर चारी वेदांची हजेरी होत असे; तेथें माणिक नगरला होणाऱ्या आरत्या होत असत व त्यानंतर श्रीप्रभुदासजी आसनावर बसत असत व त्यांच्यापुढें वेद म्हणणाऱ्या ब्राह्मणाची प्रस्तावना होत असें कीं 'महाराज आपण वेद—श्रवणप्रिय आहांत. हें ऋग्वेदांत पारंगत असलेले ब्राह्मण आले आहेत तरी ते करीत असलेली आपली सेवा आपण मान्य करून घ्यावी.' ही प्रस्तावना संस्कृतमध्यें होत असे व नंतर वेदपठण होत असे.

दर आठवड्याला १०० शंभर ह्या प्रमाणें ७ आठवड्यांत ७०० श्रीगुरुचरित्राचे सप्ताह येथें वाचण्यांत आले.

संध्याकाळीं ४ वाजल्यापासून, प्रवचन, पुराण, कीर्तन हे कार्यक्रम मांडवांत होत असत; आम्हीं गेलों त्या दिवशीं श्री १००८ स्वामी योगेश्वरानंदतीर्थ शंकराचार्य मठ जगन्नाथपुरी यांचें प्रवचन झालें. रात्रीं ११॥ वाजतां पूज्य श्री श्रीधर स्वामी हे आपल्या शिष्यांसह तेथें आले होते. ह्या स्वामींचा अधिकार फार मोठा आहे. कनकेश्वर जि. अलिबाग येथे ते गेले होते. तेथून नजीक असलेल्या एका विहिरीचें पाणी कित्येक वर्षें कडू आहे. त्याबद्दल तेथील लोकांनीं विनंती केल्यावरून श्रीस्वामींनीं त्या विहिरीवर जाऊन, त्या विहिरीचें पाणी गोड केलें आहे व अजून तें गोड आहे. फक्त श्रीस्वामींनीं असें सांगितलें आहे कीं ह्या विहिरीवर विटाळशा स्त्रियांनीं जर पाणी भरलें, अगर अपवित्र अशा गोष्टी घडल्या तर तें पाणी पुन्हा कडू होईल.

त्याचप्रमाणें तेथील यज्ञा करितां अग्नि प्रज्वलित नुसत्या मंत्रांनीं केला होता. असो. दि. १५ फेब्रुवारीला संध्याकाळीं ५ वाजतां ह्या स्वामींचें प्रवचन झालें त्यावेळीं त्यांचा परिचय करून देण्याचें काम श्री. गोडसे स्वामींचे शिष्य यांनीं केलें; त्यांत त्यांनीं श्रीस्वामींचा व गाणगापुरचा संबंध काय याविषयीं महत्त्वपूर्ण माहिती सांगितली ती अशी—'फार वर्षांपूर्वी

श्रीगाणगापुरला श्री नारायणराव व सौ. कमलाबाई असें एक अत्यंत सुशील दांपत्य आले व त्या दोघांनीं मठांत श्रीपादुकांचे दर्शन घेऊन संगमाचा रस्ता धरला व तेथेंच वस्ती केली; श्री नारायणराव यांनीं श्रीगुरुचरित्राचा सप्ताह वाचण्यास तेथें सुरवात केली, व सौ. कमलाबाई यांनीं तें वाचन मनोभावानें ऐकण्यास सुरवात केली. ती सेवा करीत असतांना श्री, नारायणराव यांनीं निश्चय केला कीं प्रत्यक्ष श्रीदत्त-दर्शन होईतोपर्यंत सेवा बंद करावयाची नाहीं; ह्या गोष्टीस अर्थातच पतिपरायण सौ. कमलाबाईचा पाठिंबा मिळाला. श्रीगुरुचरित्राचे कित्येक सप्ताह ह्यावरील दृढनिश्चयानें वाचले गेले व एक भाग्याचा दिवस असा उजाडला कीं ज्या दिवशीं श्रीदत्तप्रभूंचें त्या पुण्यवान् दांपत्याला प्रत्यक्ष दर्शन झालें! श्रीभगवानांनीं श्री. नारायणरावांना विचारलें कीं' वत्सा, काय इच्छा आहे!' नारायणरावानीं सांगितलें. 'प्रभो, ही जी अल्पशी सेवा आपली माझ्या हातून घडते आहे, तशीच आमरण घडो एवढीच माझी इच्छा आहे.' भगवंतांनीं आपली दृष्टि सौ. कमलाबाईंच्याकडे वळविली व विचारलें कीं, आपली काय इच्छा आहे. सौ. कमलाबाईनीं स्त्रीसुलभ लज्जेनें उत्तर दिलें कीं प्रभो माझ्या मनांत काय आहे ते आपण जाणतां. मी कशाला तोंडानें सांगावयास पाहिजे! पण त्या परमात्म्यानें मान हलवून सांगितलें कीं, नाहीं. तुम्ही स्वमुखानें तुमची इच्छा सांगा. नाइलाज झाल्यानें व अशी सुवर्णसंधि पुन्हां मिळणार नाहीं असें वाटल्यावरून व खात्री झाल्यावरून सौ. कमलाबाईनीं सांगितलें कीं 'देवा, मला असें वाटते कीं आपण माझ्या उदरीं यावें' जगन्नियंत्यानें स्मित मुखानें सांगितलें, 'आई तुमची इच्छा मी पूर्ण करीन परंतु तुमच्या एका पूर्वजांना असा शाप झाला आहे कीं, सात पिढ्यानंतर तुमचा वंश वाढणार नाहीं व तुमची ही सहावी पिढी आहे. तुमच्या पोटीं जो पुत्र




A cut above the average

With our long experience we know precisely how to appraise your individual requirements and add just that deft touch which can greatly enhance your personality.
★ A wide selection of materials in :
WOOLLEN, RAYON, DACRON, SHARKSKIN, COTTON HOSIERY & QUALITY READY-MADE GARMENTS.

Consult us about your new clothes

TRUEFIT & CO.

97/103, MAHATMA GANDHI ROAD
OPP. RAJABAI TOWER, BOMBAY 1

TLE : 253565

होईल तो वंशसंवर्धक असा होणार नाहीं. तो अतिशय ज्ञानी होईल. पण लहानपणींच संन्यास घेऊन मानवांना उत्तमरीतीनें मार्गदर्शन करील.' इतकें बोलून ती श्रीदत्तमूर्ति अंतर्धान पावली; व श्रीदत्तसेवेंत मग्न असतांना त्या परम भाग्यशील दांपत्याला जें पुत्ररत्न लाभलें ते हे श्रीधर स्वामी.

स्वामींचें प्रवचन ऐकण्यास सुमारें ४०० ते ५०० स्त्रीपुरुष मंडळी त्या अमरजा नदीतटीं उपस्थित होती; सर्वांचीच हृदयें भरून आली होती व दृष्टि त्या तेजस्वी श्रीधरस्वामींच्याकडे लागलीं होती. आपल्या सत्प्रवृत्त व संतसेवाशील मातापितरांच्या आठवणीनें कृतज्ञपणें श्रीस्वामींचेहि डोळे क्षणभर पाणावले. एक मिनीटभर सर्वच वातावरण अगदीं शांत होतें व सर्वजण स्वामीजींच्या मुखांतून, त्यांच्या मातापितरांच्याविषयीं व त्यांच्या स्वतःविषयीं ज्यास्त माहिती ऐकण्यास अगदीं उत्सुक दिसत होते. परंतु श्री स्वामींनीं आपल्या प्रवचनांत एका शब्दानें ही उल्लेख केला नाहीं. यांतच त्यांचा खरा मोठेपणा आहे असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें. प्रवचन 'उपासना' या विषयावर झालें. मला स्वतःला हा एक विलक्षण योग वाटला कीं श्रीदत्तप्रभूचे अवतार असलेले श्रीधर स्वामी हे सज्जन गडावर श्रीरामदासांचे अत्यंत अधिकारी अनुयायी आहेत; ह्यामुळें संत परमात्म्यांचे ऐक्य प्रतीत होते व त्याची प्रचीति येते.

दि. १५ ला रात्रीं श्री. विनायक बुवा पटवर्धन यांचे सुश्राव्य गायन ९॥ ते ११॥ पर्यंत झालें.

श्रीनृसिंहसरस्वतींच्या मठामध्यें अतिरूद्राचा अभिषेक चालू होता. श्रीकल्लेश्वरावर एकदिवस–सोमवारीं–लघुरुद्र होता. अशारीतीनें श्रीगाणगापुरला सर्व बाजूनें श्रवणीय, दर्शनीय, असा हा उत्सव चालू होता. श्रीसाईसद्गुरुंची कृपा कीं या उत्सवांत २ दिवस कां होईना भाग घेण्याचें भाग्य आम्हांला लाभलें.

—बाबांच्या बाळाचें बाळ


॥ श्री साईनाथ प्रसन्न. ॥

**एक महिन्यांत प्रॅक्टिकलसह वायरमन कोर्स**

**११ मेपासून सुरू.** मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराथींतून सकाळ–दुपार व संध्याकाळच्या वेगवेगळ्या बॅचेस. पाळी बदलणाऱ्या गिरणी कामगारांना सोइस्कर वेळा. स्त्रियां–मुलींसाठीं वेगवेगळी बॅच. शिवाय रविवारच्या व ६ महिन्याच्याहि बॅचेस्. भेटा अगर लिहा:–

**दादर इलेक्ट्रिक इन्स्टिटयूट**

पोर्तुगीज चर्चशेजारीं, 'जे' रूट बस स्टॉपसमोर, दादर (बी. बी.), मुंबई २८.

# * वाचा आणि विचार करा *

— संकलक-संत-चरण-रज —

**श्रीकुळशेखर अळवार प्रार्थना करतात:—**

प्रभो ! मला धन नको; शरीरसुख नको; राज्याची मला हांव नाहीं, इंद्रपदाची मला इच्छा नाहीं व मला सार्वभौमपद पण नको. माझी केवळ हीच इच्छा आहे का, मी तुझ्या मंदिराची पायरी बनून राहावे म्हणजे तुझ्या भक्ताचे पवित्र चरण पुन्हां पुन्हां माझ्या मस्तकावर पडतील अथवा ज्या रस्त्यानें तुझे भक्त तुझ्या सुंदर मूर्तीच्या दर्शनासाठीं नित्य जात असतात, त्या रस्त्यावरील एक रजःकण मला बनव; अथवा ज्या नाल्यामधून तुझ्या पुष्पवाटिकेतील वेलींना किंवा वृक्षांना जलसिंचन होत असते त्या नाल्यामधलें पाणी मला बनव; अथवा मला तुझ्या बागेतील चांफ्याचें झाड बनव म्हणजे त्यावरचीं चांफ्याची फुलें तुझ्या पूजेसाठीं उपयोगी पडतील; अथवा मला तुझ्या मंदिरापाशीं असलेल्या सरोवरांतला एक लहानसा जलबिंदु बनव; त्यामुळें तुझ्या सान्निध्याचा लाभ मला सतत होईल.

★

## शहाणे कोण ?

**भक्तराज प्रल्हाद म्हणतात :—**

मूर्खलोक आपल्या बाल्यावस्थेंत खेळण्यामध्यें किंवा वेडेवांकडे चाळे करण्या मध्यें आपला काळ वाया दवडतात. युवावस्थेंत तेच लोक विषय कर्दमामध्यें आपल्या कालाचा व्यय करून फसतात व वृद्धापकाळांत ते सर्वकार्यांत असमर्थ होतात. पण विवेकी पुरुष बाल्य, यौवन व वृद्धावस्था यांच्यावर मात करण्यासाठीं बाल्यावस्थेंतच आपल्या कल्याणाचा मार्ग हुडकून काढतात.

★

## देव कोठें राहातो ?

**देवर्षि नारद म्हणाले:—**

एकदां मी भगवान् विष्णूला नतमस्तक होऊन विचारलें. भगवंता ! आपला वास कुठं बरं आहे ?' भगवान् विष्णु माझें भक्तियुक्त अंतःकरण पाहून संतुष्ट होत्साते म्हणाले, 'नारदमुने ! मी वैकुंठांत वास करीत नाहीं किंवा योग्याच्या हृदयांतही वास करीत नाहीं. माझे परमभक्त एकचित्तानें ज्याठिकाणीं माझें गुणगान करीत असतात, तेथेंच नक्की माझा वास आहे. ज्याठिकाणीं मानवसमाज गंध पुष्पादिद्वारें माझ्या परम भक्ताची पूजा अर्चा करीत असतात तेथें जेवढी मला प्रसन्नता वाटते, तेवढी प्रसन्नता माझी पूजा केल्यानें मला वाटत नाहीं'

★

## दहा महादोष

**मुनिसनत्कुमार सांगतात—**

वत्स ! गुरूचा अपमान, साधु संतांची निंदा, भगवान् शिव व विष्णुमध्यें भेद, वेदनिंदा, परमेश्वराच्या नांवाखालीं पाप करणें, परमेश्वराच्या महिम्याला अर्थवाद समजणें, देवाचें नांव घेणे म्हणजे ढोंग आहे असें वाटणे, आळशी व नास्तिकाला देवाच्या नांवाचा उपदेश करणें, भगवंताच्या नांवाचा विसर पडणें व

भगवंताच्या नांवाबद्दल अनास्थाबुद्धि बाळगणें हे दहा भयानक दोष आहेत. या दोषांचा त्याग केल्यासच मानवाचें जन्माचें सार्थक होईल यांत संशय नाहीं.

★

## श्रीकृष्ण संकीर्तन

**महाप्रभु श्रीचैतन्यदेव म्हणतात :-**

चित्तरूपी आरशाला परिमार्जित करणारें, संसाररूपी दावानलाचें दमन करणारें, कल्याणरूप कुमुदिनीला विकसित करणाऱ्या ज्योत्स्नेचा विकास करणारें, पराविद्यारूपी वधूचें जीवनसर्वस्व, आनंद समुद्राला भरती आणणारें, जळीं स्थळीं पूर्ण अमृताचा वर्षाव करणारें व संपूर्ण आत्म्याला परमानंदरूप प्राप्त करून देणारें असें श्रीकृष्ण संकीर्तन सर्वतोपरि विराजमान आहे.

★

## अमृतमधुर नाम

**श्रीरूप गोस्वामी—**
**( श्रीचैतन्य देवांचे प्रमुख शिष्य )**
**म्हणतात.**

'कृष्ण' हें दोन अक्षरीं नांव जेव्हां जिभेवर नाचूं लागतें, तेव्हां अशी तीव्र इच्छा उत्पन्न होतें कीं, आम्हांला अनेक मुखें व अनेक जिभा असाव्यात. तें मधुर नांव कानांत प्रवेश करितांच अशी लालसा निर्माण होते कीं, आम्हांला कोटि, अब्ज कान असावेत. कानाद्वारें जेव्हां ही नामसुधा चित्त प्रांगणांत प्रवेश करते तेव्हां ती साऱ्या इंद्रियांच्या वृत्तींचे हरण करिते व चित्त सर्व कांहीं विसरून नामसुधेंत डुबून जातें. कुणास ठाऊक ! या सुमधुर नामसुधेची सृष्टि किती प्रकारच्या अमृतांनीं बनलेली आहे !

★

## मुक्तीचा मार्ग

**पुराण-वक्ता सूत ग्वाही देतात:-**

तीच जीभ यशदायी आहे कीं जी भगवान् शिवाची स्तुति करते. तेंच मन खरें आहे कीं जें शिवाच्या ध्यानांमध्यें संलग्न असतें. तेच कान सफल आहेत कीं जे भगवान् शिवाची कथा ऐकण्यास उत्सुक असतात व तेच दोन्ही हात यशदायी आहेत कीं जे शंकराची पूजा करितात. तेच नेत्र धन्य आहेत कीं जे महादेवांचें दर्शन करितात. तेंच मस्तक धन्य आहे. कीं, जें शिवासमोर नत होतें. तेच पाय धन्य आहेत कीं जे भक्तिपूर्वक शिवक्षेत्रांत सतत भ्रमण करीत असतात. ज्यांची सारी इंद्रियें भगवान् शंकराच्या कार्यांत गुंतून गेलीं आहेत. ते संसारसागराच्या पैलतीरावर सुखरूपपणें जातात व त्यांना भोग व मोक्ष प्राप्त होतात. शिवभक्तीनें युक्त असलेला मनुष्य ब्राह्मण, चांडाळ, पुरुष, स्त्री कोणीही का असेना तो तात्काळ संसार-बंधनांतून मुक्त होतो.

★

## कलियुगाची श्रेष्ठता

**महर्षि वेदव्यास म्हणतात:—**

जें फल सत्ययुगांत दहा वर्षें तपःश्चर्या ब्रह्मचर्य व जप इत्यादिकानें मिळतें तें त्रेतायुगांत एका वर्षांत, द्वापारयुगांत एका महिन्यांत व कलियुगांत एका दिवसरात्रींत प्राप्त होतें. आणि म्हणूनच मी कलियुगाला श्रेष्ठ म्हटलें आहे. जें फल सत्ययुगांत ध्यान, त्रेतायुगांत यज्ञ व द्वापारयुगांत देवतार्चन करण्यानें प्राप्त होतें, तेंच कलियुगांत श्रीकृष्णाच्या नामसंकीर्तनानें मिळतें.

———

# साधकांना मार्गदर्शन

श्रीरामकृष्ण परमहंस यांच्याबरोबर झालेले अनेक संवाद 'एम्' नांवाच्या त्यांच्या शिष्यानें एका ग्रंथांत संकलित केलेले आहेत. साधकांच्या दृष्टीनें हा ग्रंथ अनुपम आणि अपूर्व असा आहे. त्यांतील कांहीं भाग 'मंडणमिश्र' यांनीं अनुवादित करून येथें दिला आहे....

एक ब्राह्मो भक्त, श्रीरामकृष्णांना एका दिवशीं म्हणाला – 'महाराज! ईश्वर साकार आहे कीं निराकार?' भगवान् म्हणाले, 'ईश्वर 'असाच' आहे आणि इतर कोणत्याहि प्रकारचा नव्हे असें निश्चयात्मक कोणालाच म्हणतां यायचें नाहीं. तो निराकार आहे आणि पुन्हां साकारहि आहे. भक्तासाठीं तो आकार धारण करतो. पण जो ज्ञानी आहे, हें विश्व म्हणजे एक स्वप्न आहे अशी ज्याची निश्चिती झालेली आहे, त्याच्या दृष्टीनें मात्र तो निराकार आहे. भक्त हा स्वतः आणि इतर जग यांच्यामध्यें द्वैत मानतो. यामुळें ईश्वर त्याला 'व्यक्तिविशिष्ट देव' या स्वरूपांत दर्शन देतो. पण ज्ञानी किंवा वेदांती हा नेति नेति म्हणत चिकित्सक बुद्धीनें जगाचा अर्थ लावीत असतो. त्याच्या नित्यानित्य विवेकामुळें त्याला अशी मनोमन जाणीव होते कीं 'अहं' आणि विश्व हीं दोन्हीं मायामय आहेत, एखाद्या स्वप्नासारखीं आहेत. मग ज्ञानी माणसाला आपल्या अंतःकरणांत ब्रह्मसाक्षात्कार होतो. त्याला ब्रह्म म्हणजे काय याचें वर्णन मात्र करतां येत नाहीं.

'मी काय म्हणतों तें कळलें काय? सच्चिदानंद स्वरूप ब्रह्म म्हणजे किनारा नसलेला एकविस्तीर्ण महासागर आहे असें समजा. भक्ताच्या प्रेमाची शीतलता या सागराला जिथें जिथें लागली तिथें तिथें त्या सागराचें पाणी गोठून त्या तिथें बर्फाच्या चिपा तयार झाल्या आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे आपल्या भक्तांसाठीं ईश्वर अधून मधून विविध देह धारण करतो आणि भक्तांना व्यक्तिरूपानें दर्शन देतो. परंतु ज्ञानाचा सूर्य उगवला म्हणजे बर्फाच्या चिपा वितळून जातात. मग ईश्वर हा साकार आहे असें वाटत नाहीं. ईश्वराचे विविध आकार दिसत नाहींत. ईश्वर नेमका कसा आहे हें वर्णन करून सांगतां येणार नाहीं. त्याचें वर्णन कोण

करणार ! जो त्याचें वर्णन करूं पाहतो तो स्वतःच कोठें नाहींसा होतो. आपला 'मी' त्याला स्वतःलाच कोठें गवसेनासा होतो.

## मिठाची बाहुली

'माणूस आपलें स्वतःचें पृथक्करण करूं लागला म्हणजे त्याचा 'मी' त्याला कुठेंहि आढळत नाहीं. कांद्याचे वरचे लाल पापुद्रे काढले म्हणजे आंत पांढरे पापुद्रे दिसतात. ते काढले कीं परत आंत दुसरे पापुद्रे आढळतात. असे पापुद्रे काढीत गेल्यावर अखेर हातीं कांहींच शिल्लक उरत नाहीं.

'साक्षात्काराच्या अवस्थेंत माणसाला आपल्या 'अहं' ची जाणीव राहात नाहीं. ती शोधून काढायला कोणीं शिल्लक उरत नाहीं. त्या अवस्थेंत, त्या शुद्ध संज्ञावस्थेंत, ब्रह्माचें सत्यस्वरूप काय वाटतें, हें कोण कसें वर्णन करणार ? एकदां एक मिठाची बाहुली समुद्राची खोली अजमावण्यासाठीं समुद्रावर नेली खोली पाहाण्यासाठीं तिनें पाण्यांत पाऊल टाकलें मात्र—ती तात्काळ पार विरघळून नाहींशी झाली. आतां पाण्याची खोली कोण सांगणार ?

## ज्ञानाची खूण

'पूर्ण ज्ञानाची एक खूण आहे. पूर्ण माणूस शांत होतो. केवल सच्चिदानंद सागरांत मिठाच्या बाहुलीसारखा 'मी' विरघळून जातो आणि स्वतःच सच्चिदानंदमय बनतो. दोहोंमध्यें यत्किंचितहि भिन्नता न राहातां त्यांचा अभेद होतो.

'जोंवर स्वतःचें पृथक्करण संपूर्णतया झालेलें नसतें तोंवर माणूस मोठ्या हिरिरीनें वादविवाद करीत राहातो. परंतु आत्मदर्शन झाल्यानंतर माणूस शांत होतो रिकामी कळशी पाण्यानें भरली म्हणजे कळशींतील पाणी व तळ्यांतील पाणी एक होतें व कळशीचा बुडबुड आवाज थांबतो. कळशी भरेंतोंपर्यंत मात्र आवाज चालू रहातो.

'पूर्वींचे लोक म्हणत असत कीं महासागराच्या 'काळ्या पाण्यांत' एखादी होडी जाऊन पोंचली म्हणजे ती परत येत नाहीं.

'आपल्यांतील 'मी' नष्ट झाला म्हणजे सर्व त्रास नि संताप नष्ट होतात. तुम्ही युक्तिवादाच्या साखरेची साल काढण्याचा केवढाहि अट्टाहास करा, तरीहि हा 'मी' नाहींसा होत नाहीं. तुमच्या आमच्यासारख्या लोकांना 'मी देवाचा भक्त आहे' ही भावना असणें चांगलें.

## भक्तीचा मार्ग सुलभ

'सगुण ब्रह्म हें भक्तांसाठींच आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे ईश्वर हा सगुण आहे आणि तो व्यक्तिविशिष्ट रूप घेऊन आपल्याला दर्शन देतो अशी भक्ताची श्रद्धा असते. हाच ईश्वर आमच्या प्रार्थना ऐकतो. तुम्हीं करतां त्या सर्व प्रार्थना त्यालाच जाऊन पोंचतात. तुम्ही भक्त आहांत, ज्ञानी किंवा वेदान्ती नव्हेत. तुम्ही ईश्वराची साकार म्हणून पूजा करतां कीं निराकार म्हणून प्रार्थना करतां हा प्रश्न अगदीं गौण

आहे. ईश्वर ही एक व्यक्ति असून तो आमच्या प्रार्थना ऐकतो अशी दृढ भावना असली म्हणजे पुरे. तोच सृष्टीचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ताहि आहे आणि त्याची शक्ति अमर्याद आहे अशी निष्ठा हवी.

'भक्तीच्या मार्गाचा अवलंब करून परमेश्वराचा साक्षात्कार करून घेणें हें अधिक सुलभ आहे !

## उत्कट प्रेम हवें

ब्राह्मो भक्त :—' महाराज ! ईश्वराचे दर्शन होणें हें शक्य आहे काय ? शक्य असेल तर आम्हांला तो कां दिसत नाहीं ?'

भगवान — ' ईश्वर खात्रीनें दिसूं शकेल. साकार आणि निराकार अशा दोन्हीं प्रकारें ईश्वराचें दर्शन माणसाला घडेल. हें मी तुम्हांला कसें सांगू ?'

ब्राह्मो भक्त — ' ईश्वर दर्शन होण्याचा मार्ग कोणता ?'

भगवान — अंतःकरणाच्या उत्कट आर्ततेनें देवासाठीं अश्रु गाळणें तुम्हांला शक्य आहे काय ? आपली बायकामुलें किंवा मालमत्ता यांसाठीं माणसें घंगाळ-भर अश्रु गाळतांना आढळतात. पण ईश्वरासाठीं कोणी तरी टिपें गाळतांना दिसून येतो का ? आपल्या खेळण्यांत मूल जोंवर रमून गेलेलें असतें तोंवर आई सैंपाकपाणी व घरांतले कामधाम करीत राहते. पण खेळणीं नकोशीं होऊन तीं दूर फेंकून मुलानें आईसाठीं टाहो फोडला, कीं तत्क्षणीं चुलीवर ठेवीत असलेलें भाताचें भांडें खालीं ठेवून आई धांवत बाहेर येते आणि मुलाला उचलून घेते.'

## भिन्न मतें कां ?

ब्राह्मो भक्त :—' ईश्वराच्या स्वरूपा-विषयीं इतकीं भिन्न भिन्न मतें कां आढळून येतात ? कांहीं म्हणतात कीं देव साकार आहे तर कांहीं म्हणतात कीं तो निराकार आहे. साकार ईश्वराचा आग्रह धरणारे लोकहि त्याच्या विविध स्वरूपाचें वर्णन करतात. ही मतभिन्नता कां ?

भगवान्:—' भक्ताला जसा देव दिसतो तसें त्याच्या मनांत देवाचें चिंतन चालतें. प्रत्यक्षांत देवाविषयीं गोंधळ कांहींहि नाहीं. देवाचा कोणत्यातरी रीतीनें एकदां साक्षात्कार करून घेतला म्हणजे देवच भक्ताला हें सर्व उकलून दाखवितो. अजून तुम्ही त्या दिशेनें पाऊलहि टाकलेलें नाहीं. मग देवाविषयीं पूर्ण ज्ञान होण्याची तुम्ही अपेक्षा तरी कशी धरतां ?

' एक गोष्ट सांगतों. ती ऐका. एक माणूस एकदां एका रानांत शिरला तिथें त्यानें झाडावर एक लहानसा प्राणी पाहिला. परत आल्यावर तो माणूस सांगूं लागला कीं अमक्या अमक्या झाडावर आपण एक सुरेख तांबडा प्राणी पाहिला. तें ऐकून दुसरा माणूस म्हणाला 'मी रानांत गेलों होतों. त्यावेळीं मीहि त्या झाडावर तो प्राणी पाहिला होता. पण तूं तो तांबडा कां म्हणतोस ? त्याचा रंग तर हिरवा आहे.' तिसरा एक माणूस या दोघांचें संभाषण ऐकून म्हणाला 'तांबडा

नाहीं नि हिरवा नाहीं. तो प्राणी खरोखरी आहे पिवळा.' नंतर आणखी कांहीं इसमांनीं हा तंटा ऐकला.त्यांतले कांहीं जण आपापल्या मता प्रमाणें त्या प्राण्याचा रंग करडा, जांभळा, निळा असा निरनिराळा सांगूं लागले. शेवटीं आपल्या तंट्याचा निकाल लावण्यासाठीं सगळे लोक त्या झाडापाशींच गेले. त्या झाडाखालीं एक माणूस बसलेला होता. त्याला विचारल्यावर तो म्हणाला, 'मी या झाडाखालींच राहतों आणि तुम्ही म्हणतां तो प्राणी मी चांगला ओळखतों. कधीं तो हिरवा दिसतो, तर कधीं तांबडा, कधीं पिवळा तर कधीं करडा. त्या प्राण्याचें नांव सरडा. सरड्याचे रंग निरनिराळे दिसतात. कधीं त्याला कोणताच रंग नसतो. आतां एक रंग आहे तर थोड्या वेळानें कुठलाच रंग नाहीं.'

'याच रीतीनें जो माणूस ईश्वराचें सतत चिंतन करतो त्याला ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाजी प्रतीति होईल, भक्तांना विविध आकारांत विविध स्वरूपांत ईश्वर दर्शन देतो, हें त्यालाच काय तें कळतें. ईश्वर गुणयुक्त आहे आणि गुणविहीनहि आहे. झाडाखालीं ससत राहाणाऱ्या माणसालाच फक्त माहीत असतें कीं सरड्याचे रंग सदा बदलतात आणि कधीं तर त्याला कोणताच रंग नसतो. इतर लोक मात्र या बाबत निष्फळ वाद घालून स्वतःला त्रास करून घेतात.

कबीर म्हणत असें कीं, 'निर्गुण ईश्वर हा माझा पिता आणि सगुण ईश्वर ही माझी माता.'

'भक्ताला जें स्वरूप प्रिय असतें त्या स्वरूपांत ईश्वर त्याला दर्शन देतो. ईश्वराच्या आपल्या भक्ताविषयींच्या प्रेमाला मर्यादा नसते. पुराणांत असें लिहिले आहे कीं, आपल्या वीरभक्ताला, हनुमानाला, दर्शन देण्यासाठीं ईश्वरानें रामाचा अवतार धारण केला.

'वेदांत तत्त्वज्ञानाप्रमाणें नित्यानित्य विवेक केला म्हणजे ईश्वराची स्वरूपें व गुण हे अदृश्य होतात. या विवेकमीमांसेचा अंतिम निर्णय असा की ब्रह्म हेंच एक सत्य असून हें नामरूपात्मक जगत् मिथ्या आहे. ईश्वर साकार आहे, तो व्यक्तिविशिष्ट आहे असें चिंतन करणें व तदनुसार ईश्वराचें रूप पाहाणें हें माणसाला शक्य आहे. पण कुठपर्यंत? आपण भक्त आहोंत याची त्याला असलेली जाणीव कायम असेपर्यंत. विवेकाच्या दृष्टीकोनांतून बोलायचें तर 'भक्तपणाचा अहंकार' त्याला ईश्वरापासून थोडेंसें दूर ठेवतो.

'कृष्ण आणि काली यांच्या मूर्ति साडेतीन वितीच्या कां असतात माहित आहे का? अंतरावर सूर्य असल्यामुळें तो इतका लहान दिसतो. पण जवळ गेलांत म्हणजे सूर्य इतका मोठमोठा होत जाईल कीं, तुम्हांला तो अखेर दिसेनासा होईल. कृष्ण आणि काली यांच्या प्रतिमा दाट निळ्या रंगाच्या कां असतात? त्यांचेंहि कारण अंतर हेंच आहे. तळ्याचें पाणी दूर अंतरावरून निळें, हिरवें अथवा काळें दिसतें. जवळ जा. तें पाणी हातांत

घेऊन पहा म्हणजे त्याला रंग नाहीं असें आढळून येईल. दूर अंतरावरून आकाश निळें दिसतें. जवळ जाऊन पाहिलें तर आकाशाला रंगच नाहीं असें दिसून येईल.

## अनंताची मोजदाद निष्फळ

'तुमचा मार्ग भक्तीचा आहे; तो चांगला आहे. हा मार्ग अत्यंत सुलभ आहे. अनंत ईश्वराचा थांग कोणाला लागलेला आहे? आणि अनंताचें ज्ञान करून घेण्याची आवश्यकता तरी काय? हा दुर्लभ मानवजन्म लाभल्यानंतर ईश्वराच्या चरणकमलांवर माझी अनन्य भक्ति जडणें इतकीच काय ती अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.

'पेलाभर पाणी माझी तहान दूर करायला पुरेसें असतांना तळ्यांतल्या सगळ्या पाण्याचें मोजमाप घेत मी कशाला बसूं? अर्धी बाटली घेऊनच मी पुरता झिंगून जात असतांना गुत्त्यांत एकंदर दारू किती याचा हिशोब मला कशाला हवा? अनंताची ओळख करून घेण्याची मला जरूर ती काय?'

———



पर्वतप्राय पापराशी होती दग्ध । वाचेसी मुकुंद उच्चारितां ॥ १ ॥
अच्युत श्रीहरि केशव नरहरि । माधव हरहरि रामकृष्ण ॥ २ ॥
नामासी साधन करिशील पूर्ण । तें प्रपंचाचें भान उरों नेदी ॥ ३ ॥
उदासीन वृत्ति आचरावें कर्म । नाहीं देहधर्म गुणमाया ॥ ४ ॥
ऐसा हा अनकाळित मार्ग साधेल तुज । खेचर विसा गुज सांगे नाम्या ॥५॥

—श्री विसोबा खेचर

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा

## मानस-विज्ञानाचा मागोवा

# एका डोकेंदुखीचें मूळ

आपल्या शरीराचे मनावर आणि मनाचे शरीरावर नेहमीं परिणाम होत असतात. निरोगी माणसाचें मन प्रसन्न आणि अंथरुणाला खिळलेल्या रोग्याचें चित्त चिडचिडें असतें. हा आपला नेहमींचा अनुभव आहे. तारुण्याचें सळसळतें रक्त ज्याच्या आंगांत खेळत आहे तो युवक आशावादी असतो, आणि गलितगात्र वृद्धाची वृत्ति निराशेकडे झुकली असते हें आपण सदैव पाहातों. शरीराचा मनावर असा परिणाम होतो तसा मनाचाहि शरीरावर परिणाम घडत असतो. भयाची भावना उत्पन्न झाली कीं ती शरीराला काय करते पहा. आपली छाती धडधडूं लागते, अन्नावरची वासना जाते, हातापायांना कंप येतो, अंगाला घाम सुटतो. परीक्षेच्या मंडपांत जायच्या वेळीं, प्रवासाला जाण्यासाठीं स्टेशनवर आल्यावर, फलाटावरची गर्दी पाहिल्यानंतर, किंवा नोकरीसाठीं एखाद्या अंमलदाराची भेट घेण्याच्या प्रसंगीं, आपल्या चित्ताची धाकधूक आपल्यावर कोणते परिणाम घडवून आणते ते आठवा; म्हणजे मनाचा शरीराशी किती निकट संबंध आहे तें आपल्या ध्यानीं येईल.

असा हा संबंध असल्यामुळें शरीरविकारामुळें मन दुबळें व्हावें आणि मनोविकृतीमुळें शरीराला आजार जडावेत यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं. जे आजार निर्भेळ, शारीरिक असे म्हणायचे तेहि मनोविकारामुळें उत्पन्न होऊं शकतात असें आतां आढळून आलें आहे.

## कारण पटलें कीं रोग जातो

मनाच्या कांहीं विकारामुळें एखादा आजार जर उद्‌भवला असला तर तो डॉक्टरनें औषध देऊन नाहींसा होणार नाहीं हें उघड आहे. तो आजार उद्‌भवण्याचें मानसिक कारण कोणतें हेंच या बाबतीस हुडकून काढलें पाहिजे.

यांत नवलाची एक गोष्ट अशी कीं हें कारण हुडकून काढलें व तें रोग्याला जर पटलें तर त्याचा आजार, तात्काळ नाहींसा होतो! निर्भेळ व जुनाट शारीरिक रोग एकदम नाहींसे होत नाहींत तसे खोलवर मूळ धरलेले व मनोविकारांतून निर्माण झालेले आजारहि घालविण्यास कधीं कधीं बराच काळ लागतो. पण हा काळ मनोविकृतीचें मूळ शोधून काढण्यास लागतो. तें मूळ एकदां गवसलें म्हणजे रोग पळून जायला फारसा वेळ लागत नाहीं.

मनोविकाराचें हें मूळ शोधून काढण्यासाठीं मनाचें संशोधन करावें लागतें.

कधीं कधीं आजार फारसा चिवट व खोल नसला तर हें संशोधनहि लवकर होतें. रोग्याला स्वतःलाहि हें संशोधन करणें शक्य आहे. याचें एक उदाहरण डॉ. कॅरेन हॉर्नी या एका मानसविज्ञ डॉक्टरणीच्या पुस्तकांतून खालीं देत आहे. पेशंटचे गणपतराव हें नांव कल्पित आहे. केस डॉ. हॉर्नींच्या पुस्तकांत दिलेली आहे.

गणपतराव हे एक स्वतंत्र उद्योगधंदा करणारे गृहस्थ. लग्न होऊन पांच वर्षे त्यांनीं सुखासमाधानानें संसार केला. इतर लोकांबरोबर वागतांना आपल्यांत कांहीं न्यून आहे अशी भावना त्यांच्या मनांत सदैव वागत असे. लग्नानंतर पांच एक वर्षांनीं त्यांना डोकेदुखीचा विकार जडला. ते डॉक्टरकडे जाऊन आपली प्रकृति दाखवून आले. डोकेदुखीचें कोणतेंहि वैद्यकीय कारण नाहीं असें डॉक्टरनीं त्यांना सांगितलें. डोकेंदुखी अत्यंत तीव्र असे आणि त्याच्या यातना त्यांना फार सहन कराव्या लागत.

त्यांनीं एका मानसविज्ञाचा सल्ला एकदां घेतला होता आणि आपल्या मनाचें निरीक्षण व परीक्षण कसें करावें याची कांहीं माहिती मिळविली होती डोकेंदुखीबाबत मानसविज्ञाकडे न जातां त्याच्या पद्धतीप्रमाणें स्वतःच आपलें मनोविश्लेषण करून पहावें, असें त्यांनीं ठरविलें.

## नाटकानंतर डोकेंदुखी

एकदां गणपतराव, त्यांची पत्नी आणि त्यांचे दोघे स्नेही असे मिळून एका नाटकाला गेले होते, नाटक चालू असतांच त्यांचें डोकें दुखूं लागलें आणि नंतर नंतर त्या वेदना असह्य झाल्या. घरीं आल्यावर स्वस्थ पडून आपल्या डोकेंदुखीचें कारण ते शोधूं लागले. नाटक गचाळ होतें. म्हणून डोकें दुखू लागलें काय? नाहीं. एकतर नाटक अगदींच वाईट नव्हतें आणि दुसरें म्हणजे गचाळ नाटक हें कांहीं नेहमींच मस्तकशूळ उत्पन्न करीत नाहीं. मग आजच असें कां व्हावें? 'नाटक गचाळ नसलें तरी एवढें खरें कीं आपण म्हणत होतों त्या दुसऱ्या नाटकाला गेलों असतों तर बरें झालें असतें' असा विचार त्यांच्या मनांत आला...'तर बरें झालें असतें' हें मनांत येतांच त्यांच्या मनांत संतापाची एक चमक सणकून गेली. अमक्या नाटकाला जाऊंया असें गणपतराव म्हणत होते तर दुसऱ्या नाटकाला जावें असा इतरांचा आग्रह पडला होता. आणि शेवटीं आपलें मत बाजूला ठेवून गणपतराव दुसऱ्यांच्या इच्छेप्रमाणें वागले होते. 'बरें तुमच्या मनाप्रमाणें होऊं द्या' असें ते म्हणाले होते. मग आतां ती आठवण झाल्याबरोबर आपल्या मनांत संतापाची लहर का आली? याचें नवल करीत असतांना एकदम त्यांना जाणवलें कीं आपल्याला दुसऱ्यांच्या इच्छेपुढें नेहमीं मान वाकवावी लागते याचा आपल्या मनांत आंतल्या आंत जळफळाट होतो. या जळफळाटाचें रूपांतर आपल्या डोकेंदुखीत झालें असावें.

हा विचार मनांत येतांक्षणींच त्यांची डोकेंदुखी एकदम नाहींशी झाली!

नकळत दाबून ठेवलेला राग आणि डोकेंदुखी यांचा परस्परसंबंध आहे हें ध्यानीं येतांच गणपतराव आश्चर्यचकित झाले. आणि यापुढें कधीं डोकें दुखलें तर आपल्या मनाचा तळ शोधून पाहायचा असेंहि त्यानीं ठरविलें.

## एक स्वप्न

कांहीं दिवसांनीं एकदां पहांटे गणपतराव जागे झाले. आपलें डोकें अत्यंत ठणकते आहे असेंहि त्यांना आढळलें. रात्रीं आपल्या ऑफिसमधील इतर सहकारी अधिकाऱ्या–बरोबर ऑफिसच्या कामकाजासंबंधीं ते बराच काळ चर्चा करीत होते.

चर्चा बराच वेळ चालली होती. तीमुळें जागरणानें वगैरे आपलें डोकें दुखत असेल या कल्पनेने ते कुशीवर वळले आणि झोंपेची आराधना करूं लागले. पण डोक्याचा ठणका थांबेना आणि झोंप येईना. कां डोकें दुखत असावें याचा विचार करीत असतांना त्यांना जागें होण्यापूर्वी पडलेलें एक स्वप्न आठवलें. स्वप्नांत त्यांना आपल्या पांढऱ्या स्वच्छ बिछान्यावर दोन ढेंकूण दिसले होते. त्यांनीं एक टिपकागदाचा तुकडा घेऊन ते ढेंकूण त्वेषानें चिरडून मारले होते.

स्वप्नातल्या टिपकागदाची आठवण होतांच त्यांना ऑफिसमधील बैठकीचे स्मरण झालें आणि चर्चा चालू असतां आपल्या समोरच्या टिपकागदावर आपण रेघोट्या ओढीत होतों हेंहि आठवलें.

आणि हो हो! नुसत्या रेघोट्या नव्हत्या त्या. बैठकीचा अध्यक्ष व आपला प्रतिस्पर्धी यांची व्यंगचित्रें त्या टिपकागदावर आपण काढली होती हें त्यांना स्मरलें. 'प्रतिस्पर्धी' हा शब्द त्या दुसऱ्या अधिकाऱ्याबाबत आपल्या मनांत यावा याचें त्याना नवल वाटलें. त्या बैठकीत त्या माणसानें एक ठराव मांडला होता. आणि गणपतरावानी त्या ठरावाला विरोध केला होता. पण ठरावापासून तोटा काय याचा त्यांना स्वतःशीच स्पष्ट उमज नसल्यामुळें त्यानी ठरावाला केलेला विरोध गुळमुळीत ठरला होता व तो संमत झाला होता. आतां तो ठराव आठवतांच त्याचे परिणाम एकदम स्वच्छ असें त्यांच्या दृष्टीसमोर उभे राहिले. त्या अध्यक्षानें व दुसऱ्या माणसानें मिळून केलेल्या त्या ठरावानें गणपतरावांचें काम खूप वाढणार होतें. त्यांनीं ठराव अशा शब्दांत मांडला होता कीं, त्यामुळें वरवर पहातां त्यांतलि मख्खी गणपतरावांच्या त्यावेळीं ध्यानीं आली नव्हती. फक्त यांत त्या दोघांचा कांहीं डाव आहे, एवढें त्यांना जाणवत होतें व त्या दोघांचा धूर्तपणा आपल्या नुकसानीस कारणीभूत होणार आहे असें आंतल्या आंत त्यांना वाटत होतें. आतां त्यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला व त्या क्षणींच हे लोक म्हणजे सरळ माणसांचें 'रक्त शोषण करणारें आहेत' असा संतापाचा विचार त्यांच्या मनांत आला.

## स्वप्नाचा अर्थ

'रक्त शोषण करणारे' आणि 'ढेंकूण' हे शब्द मग त्यांच्या दृष्टीसमोर आले

[ पृष्ठ ४८ वर पहा ]

महाभारतांतील एक कथा

# अर्ध-सुवर्णमय मुंगूस

महाभारतांत पुढील गोष्ट सांगितली आहे :—

कौरव व पांडव यांजमधील युद्ध संपून कौरवांचा निःपात झाल्यावर, राज्यपद प्राप्त झालेल्या पांडवांनीं एक मोठा थाटाचा यज्ञ केला. त्या यज्ञांत गोरगरिबांना मोठमोठीं दानें करण्यांत आलीं. ब्राह्मणांना भरपूर दाक्षिणा मिळाली. पांडवांनीं या यज्ञासाठीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. पांडवांचें तें दानशौर्य पाहून सर्व लोकांनी त्यांची मोठी वाहवा केली. असा यज्ञ आमच्या पाहण्यांत आजवर कधीं आला नाहीं. एवढेंच नव्हे तर इतक्या थाटाचा यज्ञ आमच्या ऐकण्यांतहि कधीं आला नव्हता, असें सगळे लोक म्हणूं लागले व पांडवांची मुक्तकंठानें प्रशंसा करूं लागले.

हा महान् यज्ञ समाप्त होण्याच्या वेळीं एक मुंगुस तेथें आला. त्याचें अर्धें शरीर सुवर्णाचें होतें व बाकीचें अर्धें नेहमीं-प्रमाणें साधें होतें ! तेथें आल्याबरोबर यज्ञाच्या जागीं जाऊन तो मुंगूस गडबडां जमिनीवर लोळूं लागला. लोळतां लोळतां तो म्हणूं लागला,

'काय हो ! हे लोक किती खोडसाळ आहेत ! मला म्हणाले कीं येथें मोठा यज्ञ झाला. पण मला तर इथें यज्ञ झाल्याचें कांहीं एक चिन्ह दिसत नाहीं.'

त्याचें हें विचित्र बोलणें ऐकून तेथें असलेले लोक हंसले व त्याला म्हणाले,

'मूर्खा, इथें यज्ञच झाला नाहीं असें कसें म्हणतोस ? या यज्ञांतून मिळालेले दान घेऊन आज या हास्तिनापुरांतील गोरगरीबहि चांगलें सुखवस्तु बनले आहेत. या शहरांत गरीब असा कोणी उरलाच नाहीं. असें असतांना इथें यज्ञ झाल्याचें कांहीं चिन्हच दिसत नाहीं असें तूं म्हणतोस तरी कसें ? तूं अगदींच मूर्ख मुंगूस दिसतोस !'

त्यावर तो मुंगूस सांगू लागला,

'मी असें म्हणतों याला कारण आहे. मी एक घडलेली गोष्ट सांगतों. ती ऐका. आणि मग तुम्हीच काय तो निर्णय द्या.

'एका लहानशा खेड्यांत एक गरीब ब्राम्हणाचें कुटुंब होते. तो ब्राम्हण, त्याची पत्नी आणि मुलगा व सून अशीं चार माणसें त्या कुटुंबांत होतीं. त्या ब्राह्मणाची पाठशाळा होती. तेथें शिष्यांना शिकवून त्यांनीं दिलेल्या गुरुदक्षिणेंतून जी कांहीं थोडी फार प्राप्ति होत असे, त्या धनावर या कुटुंबाचा चरितार्थ कसाबसा चालत असे. अशा स्थितींत एकदां त्या भागांत लागोपाठ

तीन वर्षें अवर्षणानें मोठा दुष्काळ पडला. त्या ब्राह्मणाची प्राप्ती अतिशयच घटली. आधींच तो अत्यंत गरीब. त्यांत या दुष्काळामुळें त्याला व त्याच्या कुटुंबीयांना पोटभर अन्न मिळणें मुष्किलीचें होऊन बसलें.

त्या कुटुंबाच्या हालांना पारावार उरला नाहीं. त्यांना वारंवार उपास घडूं लागले. एकदां तर कित्येक दिवसपर्यंत लागोपाठ त्यांना सारखें उपाशीं रहावें लागलें. त्यानंतर एका दिवशीं त्या ब्राह्मणाला कोणीतरी थोडें सातूचें पीठ आणून दिलें. त्या पिठाच्या चार भाकऱ्या ब्राह्मणाच्या पत्नीनें तयार केल्या. भाकऱ्या झाल्यावर तो ब्राह्मण आतां जेवायला बसणार इतक्यांत दारांत एक भुकेला अतिथि दत्त म्हणून उभा राहिला.

'अतिथी हा देव मानून त्याचा सत्कार करावा अशी धर्माची आज्ञा, तो ब्राम्हण श्रद्धेनें पाळणारा असल्यामुळें अतिथी समोर उभा पहातांच त्या ब्राम्हणानें त्यांचें स्वागत करून त्याला बसायला आसन दिलें. नंतर तो ब्राम्हण त्या अतिथीला म्हणाला, महाराज! भोजन तयार आहे. आपण जेवायला बसावें.' असें म्हणून आपल्यापुढील ताट त्यानें त्या अतिथीपुढें ठेवलें.

'त्या अतिथीनें भराभर त्या ब्राह्मणाच्या वांट्याची भाकरी केव्हांच संपविली आणि म्हटलें, 'अहो, मी दहा दिवसांचा उपाशी आहे. गेल्या दहा दिवसांत अन्नाचा कण मला कुठें मिळाला नाहीं. आतां तुम्ही एक भाकरी मला दिलीत. ती खाऊन माझी भूक नाहींशी होण्याऐवजीं अधिक वाढली मात्र!'

'त्या अतिथीचें बोलणें ऐकून त्या ब्राह्मणाची पत्नी पुढें आली व म्हणाली, 'महाराज! ही माझ्या वांट्याची भाकरी आपण खावी.' असें म्हणून आपली भाकरी तिनें त्या अतिथीला वाढली. असें करूं नकोस, असें त्या ब्राह्मणानें आपल्या पत्नीला म्हटलें. पण ती धर्मनिष्ठ स्त्री म्हणाली, 'आपण गृहस्थाश्रमी आहांत. आणि भुकेल्याला अन्न देणें हा गृहस्थधर्म आहे. तो धर्म मी कसा सोडूं?'

'त्या ब्राह्मणीनें दिलेली भाकरी त्या अतिथीनें खाल्ली. पण त्याची भूक थांबली नाहीं. तेव्हां ब्राह्मणाचा मुलगा त्या अतिथीला म्हणाला, 'महाराज! हा माझा वांटा घेऊन आपण माझ्यावर अनुग्रह करावा! पित्याच्या धर्माचरणांत सहभागी होणें हा पुत्रधर्म आहे.' अतिथीनें तिसरी भाकरी खाल्ली. पण तरीहि त्याची क्षुधाशांति झाली नाहीं. तेव्हां ब्राह्मणाच्या सुनेनें आपल्या वांट्याची भाकरीहि त्याला वाढली. चार भाकऱ्या खाल्यावर त्या अतिथीची भूक थांबली. तृप्त व संतुष्ट होऊन त्यानें त्या ब्राह्मणकुटुंबास आशीर्वाद दिला व तो तिथून प्रसन्न मनानें निघून गेला.

'त्या रात्रीं भुकेच्या वेदनांनीं तें कुटुंब मरण पावलें. तो अतिथि ज्या ठिकाणीं बसून जेवला होता, त्या जागेवर भाकरीचे कांहीं कण पडले होते. त्या जागेवरून जातांना माझ्या अंगाला

ते कण लागले आणि त्यामुळें माझें अर्धें शरीर सुवर्णाचें झालें—'

एवढी गोष्ट सांगून तो मुंगुस पुढें म्हणाला,

'हें माझें अर्धें शरीर सुवर्णाचें बनलेलें तुम्हांला दिसतेंच आहे. त्या ब्राह्मणाच्या घरीं त्या दिवशीं जो हा अपूर्व यज्ञ झाला. त्या यज्ञस्थानाच्या स्पर्शानें माझें अर्धें शरीर सुवर्णमय होऊन गेलें. असाच यज्ञ आणखी कोठें होत असेल तर पहावा म्हणून मी तेव्हांपासून चारी दिशा अखंड फिरत आहे. पण असा यज्ञ कोठेंच न झाल्यामुळें माझें अर्धें शरीर पहिल्यासारखेंच राहिलें आहे. पांडवांनीं फार मोठा यज्ञ केला अशी बातमी ऐकली. म्हणून मी मोठ्या आशेनें इथें आलों होतों. पण इथें गडबडां लोळूनहि माझें अर्धें शरीर पहिल्यासारखेंच राहिलें आहे. माझें सबंध शरीर कांहीं सुवर्णाचें बनलें नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं या ठिकाणीं खराखुरा यज्ञ झाल्याचें कांहींएक चिन्ह मला दिसत नाहीं.'

त्याचें हें स्पष्टीकरण ऐकून यज्ञमंडपांतले सारे लोक त्याच्याकडे आश्चर्यानें नुसते पाहातच राहिले. काय बोलावें हें त्यांना कांहींच सुचेना.

\+ \+ \+

## दानाचें रहस्य

देहपात होण्याची वेळ आली तरी आश्रमधर्मापासून पराङ्-मुख न होतां आणि कसलीहि बडबड न करतां, कोणाच्याहि मदतीला पुढें होणें हा कर्मयोगानें सुचविलेला एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आपल्या दानाचा आपल्या तोंडानें कधीं उच्चार करूं नये आणि दान घेणाऱ्याकडून नुसत्या कृतज्ञतेचीहि अपेक्षा बाळगूं नये.

—स्वामी विवेकानंद



नामाचें सामर्थ्य विष तें अमृत । ऐसी हे प्रचीत आहे जीवा ॥१॥
तें नाम सोपें विठ्ठल विठ्ठल । नको काळवेळ जपे आधीं ॥२॥
नेमधर्म कांहीं न लगे साधन । सुखें नारायण जप करीं ॥३॥
चोखा म्हणे मज भरंवसा नामाचा । कळिकाळाचा भेव नाहीं ॥४॥

—श्री चोखामेळा.

श्री नरहरी सोनार यांना घडलेला साक्षात्कार

# जो शिव तोच विठ्ठल

शालिवाहन शके १२३५ च्या सुमारास पंढरपूर येथें श्री नरहरि सोनार हे प्रसिद्ध संत होऊन गेले. ते मोठे शिवभक्त होते. पंढरपूरला राहात असेत खरे पण तरीहि ते पांडुरंगाच्या दर्शनाला कधीं जात नसत. मल्लिकार्जुनाचें पूजन व भजन करण्यांत ते सदा तल्लीन असत.

एकदां एका सावकारानें विठ्ठलास असा नवस केला कीं 'जर मला मुलगा झाला तर मी तुला सोन्याचा करगोटा करून घालीन.' त्या नवसाला विठ्ठल पावला आणि त्या सावकाराला मुलगा झाला. पांडुरंगाला केलेला नवस फेडण्यासाठीं तो सावकार पंढरपूरला आला. सोन्याचा करगोटा करून त्यावर हिरे माणकें जडवून अतिशय सुबक असा दागिना करून देणारा सोनार पंढरपुरांत कोण आहे, याची त्या सावकारानें चौकशी केली. तेव्हां नरहरि सोनार हा मोठा कुशल काम करणारा आहे, असें लोकांनीं त्या सावकाराला सांगितलें.

सावकार नरहरि सोनार यांच्या घरीं गेला आणि म्हणाला,

'विठ्ठलाच्या कंबरेंत घालण्याकरतां मला एक रत्नजडित सोन्याचा करगोटा तयार करून पाहिजे आहे.'

नरहरि सोनार म्हणाले,

'मी तयार करून देतों. तुम्ही श्री विठ्ठलाच्या कंबरेचें मोजमाप घेऊन या. म्हणजे त्या मापाप्रमाणें मी करगोटा बनवतों !

'ठीक आहे.' असें म्हणून तो सावकार देवळांत गेला आणि मोज घेऊन आणून त्यानें तें नरहरी सोनार यांजकडे दिलें.

सावकारानें जें माप आणलें होतें त्याप्रमाणें एक छान करगोटा तयार करून नरहरी सोनार यांनीं तो सावकारास दिला. मग सावकारानें देवळांत जाऊन विठ्ठलाची षोडशोपचारें पूजा केली. पूजा केल्यावर त्यानें तो करगोटा विठ्ठलाच्या कंबरेस बांधण्याकरतां हातांत घेतला. कंबरेभोंवतीं करगोटा गुंडाळून पाहातो तों त्याला असें आढळलें कीं, करगोटा थोडासा आखूड आहे ! सावकाराचा विरस झाला पण काय करणार ! तो करगोटा घेऊन सावकार पुन्हां नरहरि सोनाराकडे आला व म्हणाला,

'असा कसा करगोटा बनवलात तुम्ही ? आंखूड होतो आहे तो !'

नरहरि सोनार म्हणाले,

'आखूड होतो? आश्चर्य आहे! तुम्ही जें माप आणून दिलें त्याच्या बरहुकुम मी करगोटा तयार केलेला आहे.'

असें म्हणून नरहरि सोनारानीं तें माप लावून करगोटा पाहिला तों तो त्या मापाला अगदीं बरोबर जुळत होता. सावकाराला वाटलें, माप घेण्यांत आपलीच कांहींतरी चूक झाली असेल. म्हणून तो म्हणाला,

'बरं! पण आतां हा करगोटा दोन बोटें वाढवून द्या.' नरहरि सोनार म्हणाले,

'पण आतां तरी माप बरोबर घेतलें आहे ना?'

सावकार म्हणाला,

'अगदीं बरोबर घेतलें आहे. दोन बोटांनीं आंखूड होतो आहे करगोटा. तेवढा वाढवून द्या.'

नरहरि सोनारांनीं त्याप्रमाणें करगोटा वाढवून दिला. सावकार परत देवळांत गेला आणि विठ्ठलाच्या कंबरेला करगोटा बांधूं लागला. पण काय आश्चर्य! आतां करगोटा वाजवीहून अधिक सैल होऊं लागला!

सावकार खिन्न होऊन पुन्हा नरहरि सोनारांकडे आला व म्हणाला,

'अहो, आतां हा करगोटा सैल होऊं लागला आहे. कुठें नि काय चुकतें हेंच मला समजत नाहीं. आतां असें करा. तुम्हीच देवळांत जाऊन विठ्ठलाच्या कंबरेचें माप घ्या आणि तिथल्या तिथेंच करगोटा देवाच्या कंबरेस बरोबर बसेल असा नीट करा.'

नरहरि म्हणाले,

'हें कसें व्हायचें? मी एका शंकराखेरीज इतर कोणाहि देवाचें कधीं दर्शन घेत नाहीं.'

पण सावकार ऐकेना. त्यानें फारच आग्रह केला, तेव्हां नाईलाजानें अखेर नरहरि सोनार उठले आणि तो करगोटा व इतर आवश्यक साहित्य घेऊन विठ्ठलमंदिरांकडे जाण्यास निघाले. तेथें पोचल्यावर देवळांत शिरण्यापूर्वी त्यांनीं आपले डोळे बांधून घेतले आणि मग ते देवळांत गेले.

विठ्ठलाचें मुखावलोकनहि नको म्हणून या शिवभक्तानें आपले डोळे बांधून घेतलेले पाहून कांहीं लोकांनीं त्यांची थट्टा उडविली तर कांहींनीं त्यांच्या एकान्तिक शिवभक्तीचें कौतुकहि केलें.

नरहरि सोनार विठ्ठलमूर्तीजवळ गेले आणि ती मूर्ति हातांनीं चांचपून पाहूं लागले. तों चमत्कार असा घडला कीं त्यांच्या हाताला शिवमूर्तीचाच भास होऊं लागला! ती मूर्ति शंकराचीच आहे असें त्यांना वाटूं लागलें. पांच मुखें, दहा हात, गळ्यांत सर्प, मस्तकावर जटा असा पंचमुखी शिवाचा आकार त्यांच्या हाताला जाणवूं लागला.

नरहरि सोनार नवलानें म्हणाले,

'अरे! हें तर माझ्या इष्टदैवताचें स्वरूप! विठ्ठलाची ही मूर्ति नसून ही तर शिवाची मूर्ति दिसते. हा काय प्रकार आहे?'

शेवटीं मनाची खात्री करून घेण्यासाठीं त्यांनीं आपले डोळे ज्या पट्ट्यानें बांधलें होते तो पट्टा सोडला आणि मूर्ती-

पाहिली. पहातात तों तेथें शिवमूर्ती नाहीं! प्रसन्न वदन श्रीविठ्ठलाची मूर्ति त्यांच्या नजरेस पडली.

'अरे, हें मी काय केलें!' असा खिन्न उद्‌गार काढून त्यांनीं परत डोळे झांकून घेतले व ते मूर्ति चांचपूं लागले. पण परत त्यांच्या हाताला ती दशभुज पंचमुखी शिवमूर्तीच लागूं लागली. पुन्हां डोळे उघडून पहातात तों श्रीविठ्ठल समोर उभा!

मग मात्र त्यांच्या अंतःकरणांत लख्ख प्रकाश पडला. आपण शिव व विठ्ठल यांच्यामध्यें जो भेदभाव मानीत होतों, तो घालविण्यासाठीं देवानें आपल्याला इथें आणून हा घडा आपल्याला शिकविला हें त्यांना पटलें. त्यांना पश्चात्ताप झाला. श्री विठ्ठला पुढें त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला आणि त्याची पुन्हां पुन्हां क्षमा मागितली.

एका अभंगांत श्रीनरहरि सोनार म्हणतात !—

शिव आणि विष्णु एकाचि प्रतिमा।
ऐसा ज्याचा प्रेमा सदोदित ॥ १ ॥
धन्य ते संसारी नर आणि नारी।
त्र्याचे हरहरि उच्चारित ॥ २ ॥
नाहीं पैं भेद अवघा मनीं अभेद।
द्वेषाद्वेषसंबंध उरीं नुरे ॥ ३ ॥
सोनार नरहरि न देखे द्वैत।
अवघा मूर्तिमंत एकरूप ॥ ४ ॥

———

( पृष्ठ ४२ वरून )

आणि आपल्या स्वप्नाचा अर्थ त्यांना कळून चुकला. आपल्याला काम करायला लावून हे दोघे मजेंत राहाणार आपलें रक्तशोषण करणार या त्यांच्या गूढ मनातील कल्पनांना स्वप्नांत ढेंकणाचें स्वरूप आलें होतें. त्या दोघांच्याबद्दल तुच्छतेच्या भावनेने त्यांनीं त्यांचीं व्यंगचित्रें टिपकागदावर काढलीं होतीं. तर स्वप्नांत टिपकागदानें त्यांनी रक्तशोषक दोन ढेंकूण निपटून मारले होते. त्यांच्या मनांत साचलेल्या रागाला त्यांनीं असें स्वप्नांत मूर्तस्वरूप दिलें होतें. पण तेवढ्यानें त्या झांकलेल्या रागाची वाफ निघून न गेल्यामुळें त्यांचें डोकें ठणकूं लागलें होतें.

हा परस्परसंबंध उमजून येतांच त्यांचें डोकें दुखायचें थांबलें!

अशाच आणखी एक दोन प्रसंगी गणपतरावांनीं आपल्या डोकेंदुखीची मीमांसा करून ती घालविली व नंतर त्यांची डोकेंदुखी कायमची बंद झाली.

डोकेंदुखीचा विकार केवळ आपल्या मनाचें संशोधन करून घालवितां येण्याची ही कला आपल्यालाहि साध्य झाली तर किती बहार होईल! असा विचार तुमच्या मनांत आला असेल. ही गोष्ट अगदींच अशक्य आहे असें नाहीं. आपल्या मनाची जानपछान जर आपण नीट करून घेतली तर आपले अनेक आजार आपण पळवून लावूं शकूं. आधुनिक मानसविज्ञानानें असे अनेक चमत्कार घडवून आणलेले आहेत. साईलीलेच्या वाचकांना या मनोवेधक शोधांचा अधूनमधून परिचय करून देण्याची माझी मनीषा आहे.

—द. पां. खांबेटे



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचे तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अ. सावंत, ईस्ट अँन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.